शुक्रवार, १४ जून २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २८२
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 14 JUNE 2024 | adhunikkesari.com | ● YEAR-03 ● ISSUE-282 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-05

## काटे कूठेच नव्हते, दगा दिला फुलांनी : प्रताप पाटील चिखलीकर यांची खंत

आधुनिक केसरी न्यूज



**भोकर :** नांदेड लोकसभा मतदार संघात ज्यांनी माझ्यासाठी कष्ट केले, त्यांच्यासाठी एक पाऊल पुढे जाऊन काम करणार आहे. काही आस्तिनातील सापानी कडाडून चावा घेतल्याने दगा फटका बसला आहे.काटे कुठेच नव्हते दिला दगा फुलांनी, अशी खंत माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी बुधवारी व्यक्त केली आहे. शहरातील ओम लॉन्स येथे आभार सभा घेण्यात आली त्यावेळी ते बोलत होते.व्यासपीठावर जिल्हा अध्यक्ष कीशोर देशमुख,कीशोर पाटील लगळुदकर, महेंद्र कांबळे, विनोदी पाटील चिंचाळकर,गोविंद पाटील नागेलीकर, जगदीश पाटील भोसीकर, भगवान दंडवे, राजा खंडेराव देशमुख, रामचंद्र मुसळे, राजेश्वर देशमुख, प्रवीण गायकवाड, सुलोचना ढोले, गणपत पीठ्ठेवाड, आरपीआयचे जयभीम पाटील,राजेश करपे, मनोज शिंदे यांची उपस्थिती होती. चिखलीकर म्हणाले की, ज्यानी प्रमाणिक काम केलं त्यांच्यावर अन्याय होण्याची शक्यता आहे. अशोक चव्हाणा मुळे भाजपात उत्सुकता निर्माण झाली होती तेव्हा आपला विजय निश्चित आहे अशी अपेक्षा होती. हार जित सोडून द्या,भावी काळात होवू घातलेल्या विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिष निवडणुकीत मी कार्यकर्त्यांच्या मागे खंबीरपणे उभे राहणार आहे. पक्षश्रेष्ठ कोणालाही उमेदवारी देवो, त्यांच्या पाठिशी ताकतीने उभे राहवे. लोकसभेत पराभव झाला तरी नांदेडमध्ये नऊच्या नऊ विधानसभा महायुतीच्या ताब्यात घेण्यासाठी सर्वांनी सज्ज रहावे असे सांगितले.सुत्रसंचालन गणेश कापसे यांनी केले. आभार चंद्रकांत नागमोड यांनी केले. यावेळी माधव शिंदे, विठ्ठल धोंडगे, राजेश्वर रेड्डी, मनोज शिंदे, सुनील शहा, कल्पना भोसले,विशाल माने,निनाद इनामदार,प्रितम डोंगरे, राहुल जाधव, संतोष डोंगरे, संदिप लोमटे ,वेनू कोंडलवार यांची उपस्थिती होती.

ज्या कार्यकर्त्यांनी माझ्या साठी तन मन धनाने काम केले त्यांच्या साठी मी प्रामाणिक पणे काम करिन नव्हे तर त्यांना यश मिळवून देईन.पराभवाचे आत्म चिंतन करा. आपल्या पराभवाने नांदेड जिल्हा विकासा पासुन दुर ठेवलो आहे. आपल्याच काही कार्यकर्त्यांनी दगा दिल्याने माझा पराभव झाला. काटे कूठेच नव्हते केला दगा फुलांनी अशी खंत प्रताप पाटील चिखलीकरांनी व्यक्त केली आहे.

# सरकारला नवा अल्टीमेटम

## मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण स्थगित

आधुनिक केसरी न्यूज

**जालना : गेल्या 5 दिवसांपासून मराठा आरक्षण आणि सगेसोयरे अंमलबजावणीसाठी उपोषणावर बसलेले उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी अखेर उपोषण गुरूवारी स्थगित केले आहे. राज्य सराकारच्यावतीने मंत्री शंभुराज देसाई आणि खा. संदिपान भुमरे यांनी मनोज जरांगे यांची भेट घेऊन त्यांना सगेसोयरेच्या अंमलबजावणीबाबत काम सुरु असल्याची माहिती दिली. तसेच, मी प्रथमच तुमच्याकडे आलो आहे, तुम्ही सरकारला 2 महिन्यांचा अवधी द्यायला हवा, अशी मागणी देसाई यांनी केली होती. त्यानंतर, मनोज जरांगे यांनी राज्य सरकारला 1 महिन्याचा अवधी दिला असून आपले उपोषण स्थगित केल्याची घोषणा केली.**

पुढील 1 महिन्यात मागण्या मान्य न झाल्यास विधानसभा निवडणुकीत पूर्ण तयारीनिशी उभारणार असल्याचेही जरांगे यांनी यावेळी केली. त्यानंतर, मंत्री शंभुराज देसाई आणि संदीपान भुमरे यांनी ज्युस पाजून त्यांचे उपोषण सोडवले. दरम्यान, मनोज जरांगे यांनी उपोषण मागे घेत असल्याची घोषणा करताच अंतरवाली सराटीत जल्लोष आणि घोषणाबाजी करण्यात आली.

सगे सोयरे याची व्याख्या आहे, त्याप्रमाणेच हवी, समाजला फटका बसायला नको. मराठा आणि कुणबी एक आहेत, हा कायदा पारित करायला हरकत नाही. सरकारने हैद्राबाद गॅजेट लागू करावे, सातारा संस्थान मुबई गॅजेट लागू करावे, असे मनोज जरांगे यांनी यावेळी म्हटले. तसेच, राजे शब्दाला वेगळे आहेत म्हणून त्यांच्याशी बोलतो आहे, असे म्हणत शंभुराज देसाईंच्या विनंतीनंतर आपण उपोषण स्थगित करत असल्याची घोषणाही मनोज जरांगे यांनी केली. मराठा आरक्षण व कुणबी प्रमाणपत्रासंदर्भात नेमण्यात आलेल्या शिंदे समितीला कायम नोंदी शोधण्यासाठी सांगण्यात आले आहे. आता आमच्या अडचणी सांगतो, नोंदी सापडल्या पण सर्टिफिकेट काही अधिकारी देत नाहीत. त्यानंतर, व्हेरिफिकेशन देत नाहीत. ईडब्लूएसमधून ईसीबीसीमध्ये येता येते, पण ओबीसीत येता येत नाही. त्यामुळे, त्यांना मार्ग खुला करावा अशी मागणी जरांगे यांनी केली.

आम्ही पाच महिने वेळ दिला त्यात 2 महिने आचारसंहितेमध्ये गेले आहेत. वाशीपासून आजपर्यंत 5 महिने दिले, पण सरकारने काही केले नाही. आम्ही तुम्हाला 30 जूनपर्यंत मुदत देतो, पण त्यांनी 1 महिना मागितला आहे. आता तुम्हीच सांगा काय करायचे, असा प्रश्न जरांगे यांनी समोरील लोकांना विचारला. त्यानंतर, सरकारला 13 जुलैपर्यंत 1 महिन्याची मुदत देण्यात आली. तसेच, 1 महिन्याच्या आत सरकारने मागण्या पूर्ण केल्या नाहीत, तर निवडणूक लढवणार. 1 महिना देण्यास आम्ही तयार, त्यानंतर काही म्हणू नका. वेळ आली तर विधानसभेला जागेवर सीट उभा नाही करणार, तर नावं घेऊन उमेदवार पाडणार, असा इशाराही जरांगे पाटील यांनी सरकारमधील नेत्यांना दिला. दरम्यान, 1 महिन्यात सरकारने आरक्षणासंदर्भातील निर्णय दिला नाही तर मराठे ऐकणार नाहीत. या काळात मी निवडणूक लढवण्याची चळवळ सुरू करणार असून 14 जुलैला सरकारचा एक शब्दही ऐकणार नाही, असेही जरांगे यांनी म्हटले.



**काय म्हणाले शंभूराज देसाई :** शिवाजी महाराज यांच्या साक्षीने मागण्या मान्य करणार असून मनोज जरांगे यांनी उपोषण स्थगित करावे, असे शंभूराज देसाई यांनी म्हटले . माझे एसआयटीबाबत फडणवीस यांच्याशी बोलणे झाल्याचेही त्यांनी सांगितले . सगेसोयऱ्यांची अंमलबजावणीसंबंधी सरकारची मानसिकता नाही हे जरांगेंनी डोक्यातून काढून टाकावे, शिंदे साहेबांनी त्याचा शब्द दिला आहे . हा प्रश्न कायद्याच्या चौकटीतून सोडवू, त्याला इतरांचा विरोध व्हायला नको . यावर येणाऱ्या हरकती या मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर ठेवल्या जातील . सगे सोयऱ्यांच्या बाबतीतील ही टेक्निकल प्रोसेस लवकर करू . अधिकाऱ्यांना बोलावतो, किती हरकती आल्या, किती छानणी केल्या, किती राहिल्या याचा टाईम बॉण्ड अहवाल जाहीर करू . तुम्ही तब्येतीकडे लक्ष द्या मित्र म्हणून माझे ऐका . तुमचे प्रतिनिधी पाठवा, त्यांचे नाव सांगा, आपण बैठक मुख्यमंत्र्यांकडे लावू, असे आश्वासन शंभूराज देसाईंनी मनोज जरागेंना उपोषणस्थळावरुन दिले .



## विधानसभेच्या अनुभवाचा फायदा लोकसभेतून विकासासाठी करणार

### खासदार प्रतिभा धानोरकर

आधुनिक केसरी न्यूज

**वरोरा :** भद्रावती विधानसभेच्या माध्यमातून जनतेने आमदार म्हणून निवडून दिले. २०१९ ते २०२४ या कालावधीत विधानसभेच्या माध्यमातून जनसामान्यांची संपूर्ण कामे करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केल्याचे मत खासदार धानोरकर यांनी व्यक्त केले. यावेळी विधानसभेच्या अध्यक्षांकडे राजीनामा सुपूर्द करुन विधानसभा सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे आभार मानले. यावेळी अध्यक्षांनी खा. प्रतिभा धानोरकर यांना शुभेच्छा देऊन त्यांनी विधानसभेत केलेल्या कार्याचे कौतुक केले. खा. धानोरकर यांनी विधानसभेत वेळोवेळी जनतेच्या प्रश्नांवर चर्चेसाठी संधी दिल्याबद्दल अध्यक्षांचे आभार मानले. जनतेने ठेवलेल्या विश्वासाबद्दल कायमची ऋणी राहीन व विधानसभेत विविध आयुधांद्वारे जनतेच्या प्रश्नांवर केलेल्या चर्चेच्या अनुभवनातून लोकसभेत नव्या दमाने कार्य करण्याची प्रेरणा मिळणार असल्याचे मत याप्रसंगी खा. प्रतिभा धानोरकर यांनी व्यक्त केले. दिवंगत खासदार बाळू धानोरकर व मला विधानसभेचा कालावधी पूर्ण करता आला नाही, पण जनतेच्या आशिर्वादाने आम्हाला खासदार म्हणून जनतेने दिलेली संधी माझ्या आयुष्यासाठी प्रेरणादायी ठरलेली आहे. या निवडणूकीत जनतेने भरभरुन दिलेले आशिर्वाद मी विकास कार्यात परावर्तित करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे मतदेखील यावेळी व्यक्त केले. भविष्यात देखील जनतेच्या कामांसाठी राज्य सरकारच्या माध्यमातून जनतेचे प्रश्न मार्गी लावणार असल्याचे खासदार प्रतिभा धानोरकर यांनी सांगितले.


## आधुनिक केसरीचा दणका; आ. कैलास पाटलांकडून परिवहन महामंडळातील अधिकाऱ्यांची खरडपट्टी

### बसस्थानकात मुरूम टाकण्यास सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** सतत प्रवाशांच्या, शाळकरी विद्यार्थी विद्यार्थिनींच्या गर्दीत अडकलेल्या धाराशिव एसटी



बसस्थानक परिसरात पहिल्याच पावसाने चिखलाचे साम्राज्य व बसस्थानकासमोर पाणी साचले होते. याबाबत दि.९ जून रोजी दैनिक आधुनिक केसरी वृत्तपत्रांमध्ये बातमी प्रसिद्ध करण्यात आली होती. या बातमी बाबत धाराशिव येथील आमदार कैलास पाटील यांच्याकडून तत्काळ दखल घेत एसटी बसस्थानक परिसरात स्वतः हजर राहून एस.टी महामंडळातील अधिकाऱ्यांना धारेवर धरत बसस्थानक परिसरामध्ये तात्काळ मुरूम टाकण्यास व बसस्थानकासमोर साचलेले पाणी काढण्यासाठी तत्काळ उपयोजना करण्यासाठी.


नियोजन शून्य कारभारामुळे प्रवाशांचे हाल


आधुनिक केसरी न्यूज

## नांदेड, छत्रपती संभाजीनगरसाठी लवकरच विमानसेवा

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** विदर्भ आणि मराठवाड्यातील प्रमुख शहरांदरम्यान लवकरच विमानसेवा सुरू होत असल्याने राज्यातील हे दोन प्रदेश अधिक जवळ येणार आहेत. स्टार एअरची नागपूर ते नांदेड ही सेवा येत्या २७ जूनपासून आणि इंडिगो एअरलाइन्सची नागपूर- छत्रपती संभाजीनगर येत्या २ जुलैपासून विमानसेवा सुरू होत आहे. स्टार एअरने नागपूर ते नांदेड विमानसेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. ही सेवा २७ जूनपासून सुरू होत असून आठवड्यातून सोमवार, मंगळवार, गुरुवार आणि शुक्रवार असे चार दिवस राहणार आहे. नागपूर ते नांदेड विमान नागपूरहून सकाळी ९.१५ वाजता निघेल आणि नांदेडला १०.०५ वाजता पोहोचेल. नांदेडहून दुपारी १.१० वाजता विमान निघेल आणि दुपारी २ वाजता नागपुरात पोहोचेल. इंडिगो एअरलाइन्सची येत्या २ जुलैपासून ही विमानसेवा सुरू होत आहे. आठवड्यातून तीन दिवस मंगळवार, गुरुवार आणि शनिवार ही विमासेवा राहणार आहे. फ्लाइट क्रमांक ६ई-७४६२ हे विमान नागपूरहून सकाळी ९.४० वाजता उड्डाण भरेल आणि छत्रपती संभाजीनगरला सकाळी ११ वाजता पोहोचेल. त्याचप्रमाणे फ्लाइट क्रमांक ६ई-७४६७ विमान छत्रपती संभाजीनगरहून दुपारी ४.४० वाजता उड्डाण घेईल आणि ६.१० वाजता नागपूर येथे पोहोचेल.

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

## चांदणे शब्दफुलांचे...

नारायण श्रीपाद राजहंस...! बस नामही काफी हैं. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा अभिमान बाळगणाऱ्या रसिकांना नारायणराव राजहंस म्हणजेच ' बालगंधर्व ' हे सांगावं लागत नाही. ' बालगंधर्व म्हणजे मराठी रसिकांच्या ' मर्मबंधातली ठेव ' ! बालगंधर्व म्हणजे मराठी नाट्यरसिकांचा, संगीतप्रेमींचा एक हळवा कोपरा ! या भूलोकीच्या गंधर्वावर अनेक पुस्तके लिहिली गेली. डॉक्युमेंटरीज,चित्रपट निघाला. ज्यांनी बालगंधर्वांना पाहिले, ऐकले अशा भाग्यवान लोकांपैकी फारच थोडे लोक आता हयात असतील. मी बालगंधर्वांना पाहिले किंवा ऐकले नाही. पण त्यांच्याबद्दल जेव्हा काही वाचायला मिळालं ते वाचलं. सुबोध भावेंनी भूमिका साकारलेला बालगंधर्व चित्रपट पाहिला. पुण्यातल्या रसिकांचं बालगंधर्व रंगमंदिराचं प्रेम अनुभवलं. कधी संधी मिळाली तर बालगंधर्वला जाऊन काही नाटकं पाहण्याचा आनंद घेतला. बालगंधर्व आणि मी यांच्यातलं नातं एवढंच मर्यादित ! मला ना गाता येत ना नाट्यसृष्टीशी मी कुठल्या तरी अंगाने निगडित ! पण या महाराष्ट्रातला आणि महाराष्ट्राबाहेरचा जो तमाम मराठी रसिक आहे ना त्यांचा मी एक छोटासा प्रतिनिधी म्हणून निश्चितच या विषयावर आपल्याशी संवाद साधू शकतो. याच महाराष्ट्रात जसे बालगंधर्व होऊन गेले, तसा आणखीही एक गंधर्व होऊन गेला. तो शब्दगंधर्व ! रसिकराज ! समस्त मराठी रसिक आणि कलाकार यांच्यात ' आपुलकीचा ' पूल बांधणारा. या शब्दगंधर्वाचं नाव आहे पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे अर्थात तुमचे आणि माझे पुलं आणि सर्वांचे लाडके भाई. बालगंधर्व हा जसा मराठी चित्र/नाट्य रसिकांचा हळवा कोपरा आहे तसाच एक कोपरा आहे या ' भाईचा. ' मराठी रसिकांच्या मनातली जागा अशा काही काही निवडक माणसांनी आरक्षित केली आहे. कोणी जर म्हटले की मी तुम्हाला अमुक एक इतकी रक्कम देतो, पण तुमच्या मनातील ही जागा मला द्या तरी माझा मराठी माणूस सगळं काही द्यायला तयार होईल पण बालगंधर्व, पुलंसारखी माणसे म्हणजे त्याचं दैवत ! तो ती जागा कशी देईल ! याच पुलं आणि बालगंधर्व यांच्यामध्ये संबंधाचा एक नाजूक पूल आहे. पुण्यातलं बालगंधर्व रंगमंदिर पुलंच्या पुढाकारानं उभं राहिलं. त्याच्या उदघाटनाचा पडदा साक्षात बालगंधर्वांच्या हाताने वर गेला. पुण्याला महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणतात ते काही उगीच नाही.



## गोरक्षनाथ

आधुनिक केसरी

नाथपंथात स्त्रीशूद्रांच्या उद्धाराची तळमळही प्रामुख्याने दिसते. विमलादेवी व मैनावती या दोन स्त्रिया नाथपंथात होत्या. बंगालमधील



नाथपंथीय हडिपा (जालंदरनाथ) हा एक अंत्यज होता. गोरखनाथांच्या प्रेरणेमधूनच भाषेचा उपयोग अखिल भारताच्या संदर्भात होत राहिला. गोरखनाथांच्या पंथात वर्णाश्रमधर्माला स्थान नसल्यामुळे वर्णभ्रष्टांना या संप्रदायाचा मोठाच आधार वाटला. 'गोरक्षचरित्र म्हणजे गुण व शक्ती या दोन गोष्टींचा एक सुरेख मणिकांचन योग आहे. ब्रह्मचर्यपरायण, ठयोगाचारनिष्ठ व नीतिसंपन्न अशा योगी संप्रदायाच्या विकासाचे मूळ श्रेय गोरक्षनाथांकडेच आहे... त्यांचा उपदेश व त्यांचे प्रत्यक्ष आचरण यांमध्ये फ़रक नव्हता... त्यांनी जीवनाकरिता ब्रह्मचर्य, संयम, उद्वेगरहित हृदयमार्ग योग्य मानला होता. जर त्यांनी ह्या मार्गाचे प्रत्यक्ष आचरण केले नसते तर निखालसपणे मत्स्येंद्रांच्या उद्धाराकरिता ते न जाते व स्वतःच त्या ठिकाणी रममाण झाले असते. त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांवरून हे स्पष्ट दिसून येते की, ते कामिनी आणि कांचन या दोनही गोष्टींना साधी राहणी व साधनात्मक जीवन यांच्या दृष्टीने विघातक मानीत असत... ते यौगिक सिद्धींचा प्रयोग फक्त परहितसाधनांकरिताच करीत होते.' (अमनस्कयोग : पृष्ठे २८-२९) त्यांचा संप्रदाय स्वतःला अतिवर्णाश्रमी मानतो. ते समदृष्टीने वावरत. भोग, मद्य, मांस इत्यादींच्या सेवनापासून ते अलिप्त होते. योगी पुरुषांना द्रव्याची इच्छा नसावी, असे त्यांना वाटे. स्त्रीकडे बघण्याची त्यांची दृष्टी मातृभावाची होती.

## देहान्तनिरूपण

आधुनिक केसरी

सूक्ष्म देह स्थूल देहाच्या आधाराने रहातो, त्याला तो पूर्णपणे व्यापून रहातो. सूक्ष्म देह स्थूल देहाला चिकटून असतो तोपर्यंत माणुस जिवंत असतो. सूक्ष्म देह स्थूल देहाच्या बाहेर पडून त्यांच्याशी कायम संबंध सोडतो तर तेव्हा मनुष्य मरण पावतो. कातडी, स्नायु, रक्त, हाडे, ग्रंथी व मज्जातंतु किंवा नसा हे स्थूल देहाचे घटक असतात. प्राण,मन, बुध्दी, अहंकार, वासना हे सूक्ष्म देहाचे घटक असतात. वासना हा प्रधान घटक आहे. जेव्हा मनुष्य देह वासना विरहीत होईल तेव्हाच तो मोक्षास पात्र असतो.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646



आधुनिक केसरी


## अभंग पिंपळ | सळाळतो ||

चालता बोलता | मुखी नाम देवा ||
श्वासचा विसावा | तुझ्या पायी ||१||
सत्कर्मी राबावे | दुष्कर्मा टाळावे ||
स्वधर्मा जागावे | निरंतर ||२||
वागावे जनात | करूनी विचार ||
पाळावा आचार | विवेकाचा ||३||
विकाराचे बीज | जळूनिया जावे ||
जुळोनिया यावे | संत सूर ||४||
मनाच्या मंदिरी | सावळा श्रीरंग ||
पिंपळ अभंग | सळाळतो ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## हितगुज



पुष्प ८९वे



**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**

## कौटुंबिक पर्यावरण


परीक्षेसाठी मुलांच्या मनात पालकांनी जबाबदारीची, स्वयं-अध्ययनाची भावना बळकट करावी. त्यासाठी नेमके काय करावे, याचा क्रमशः परामर्श आणि विषयपरत्वे घेणार आहोत. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना परीक्षा ही नवलाची व अभ्यासातून मुक्त करून सुट्या देणारी गोष्ट वाटते. पालकांनी त्यांच्या या भावनेचा चांगला उपयोग करून परीक्षेचे महत्त्व लहानपणापासून बिंबवावे, त्याबद्दलची जागरूकता, पूर्वतयारी, नियमित अभ्यास, उत्तम यशाचे कौतुक, परीक्षेचे फायदे हसत-खेळत समजावून द्यावेत. लहान मुले म्हणजे मनाची कोरी पाटी, हवी तशी वळणदार अक्षरे सुबकपणे तुम्हांला त्यावर गिरवता येतील किंवा मुले म्हणजे कमावलेला मातीचा गोळा ज्यावर भावना, विचार कौशल्याने कोरून ती साधनेच्या, संस्काराच्या आंचेत भाजून पक्की करायची आहेत म्हणून घडवणारे हात ही कुशल, विवेकी, कर्तबगार, प्रतिभावंत निर्मात्याचे हवेत. अर्थात पालकत्वाची भूमिका निर्मात्याची सुद्धा असते. त्यासाठी मुलांना सुयोग्य, सुसंस्कारीत कौटुंबिक वातावरण नेहमी मिळायला हवे. त्यात अकृत्रिम प्रेम, जिव्हाळा, आपुलकी व नीतिमानता असावी. घरातली स्वच्छता, प्रसन्नता, साधेपणा, मोकळेपणा, एकमेकांविषयीचा आदर, कामसूपणा, जबाबदारी उचलण्याची प्रवृत्ती, आध्यात्मिकता, नवनवीन विषयांची चर्चा, विचारपूस, अडचणी सोडवणे, या सर्वांचा कळत-नकळत मोठा परिणाम मुलांवर होत असतो. पालकांची कर्मनिष्ठा व शिस्त, सचोटी व सदाचार मुलांच्या मनात अनुकरणातून घट्ट रुजतो. म्हणून पालक व्यवहारकुशल व चारित्र्यसंपन्न असणे, हा उन्नत समाजाचा पाया आहे. जी मुले रोज आपल्या आई-वडिलांना नमस्कार करतात. त्यांचे पूर्वसंचिताचे दोष नाहीसे होतात. आई-वडिलांचे आशीर्वाद त्यांच्यासाठी चांगल्या प्रेरणांचे कवच निर्माण करतात. माणसाचे विचार सूक्ष्म ध्वनी-लहरींप्रमाणे प्रसारित व संज्ञापित होतात. मग आशीर्वाद व उत्कंट सदिच्छा सुद्धा मुलांच्या हृदयापर्यंत, मेंदूपर्यंत पोहचून त्यांना योग्य प्रेरणा नक्कीच देतात म्हणून पवित्र, शुद्ध आचार-विचारांचे पर्यावरण सतत कुटुंबात असणे, प्रगतीचे प्रथम लक्षण आहे.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

## नाम व भगवंत

आधुनिक केसरी

' राम राम ' म्हणून राम कसा भेटेल या विचारण्यात काहीच अर्थ नाही. उलट असे म्हणता येईल की, 'राम राम' म्हटल्याशिवाय राम भेटणेच शक्य नाही. व्यवहारातही आपला हाच अनुभव आहे. समजा, आपल्याला एका गावाला जायचे आहे म्हणून आपण स्टेशनवर गेलो, आणि जिथे जायचे आहे त्याचे सर्व वर्णन केले पण नाव सांगता आले नाही, तर आपल्याला तिकीट मिळेल का ? उलट, त्या गावातली काही माहिती नाही पण नाव ठाऊक आहे, तर आपल्याला तिकीट मिळून तिथे जाता येईल. म्हणजे, ठिकाण माहितीचे आहे पण नाव तेवढेच न आठवले तर काहीही उपयोग होत नाही. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, बाकी सर्व केले पण नाम नाही घेतले तर काही उपयोग होत नाही; म्हणून नाम घेणेच जरूर आहे. नामाने भगवंताची प्राप्ती होणार ही खात्री असावी. भगवंताच्या नामाची गरज दोन तऱ्हेने आहे : एक, प्रपंचाचे स्वरूप कळण्यासाठी, आणि दुसरी, भगवंताच्या प्राप्तीसाठी. खायला-प्यायला पोटभर, बायकोमुले, घरदार, वगैरे



सर्व गोष्टी असल्या तरीसुद्धा आपल्याला काळजी आणि तळमळ का असते हे आपल्याला कळत नाही. याचा अर्थ, दुःखाचे खरे स्थान कुठे आहे हे कळत नाही. ते कळण्याकरिता भगवंताच्या नामाची गरज आहे. भगवंताची तळमळ लागेपर्यंत नामाची जरुरी आहे; नंतर, भगवंतावाचून आपल्याला दुसरा आधार नाही म्हणून नाम घ्यायला पाहिजे; आणि शेवटी, भगवंताच्या दर्शनानंतर नाम सवयीने आपोआप येते. एकूण, आरंभापासून शेवटपर्यंत भगवंताचे नामच शिल्लक राहते. जो नामस्मरण करील आणि त्याचे अनुसंधान ठेवील त्याला भगवंताची जिज्ञासा आपोआप उत्पन्न होईल. नामाकरिता नाम घ्या, की त्यात राम आहे हे कळेल. नाम घेताना, जे घडेल ते चांगले आणि आपल्या कल्याणाचे आहे असा भरवसा ठेवा.

भगवंताचे नाम हीच सच्चिदानंदस्वरूप सद्वस्तू होय. भगवंताच्या नामात जो स्वतःला विसरला तो खरा जीवन्मुक्त होय. जे काय साधायचे ते हेच. बाकीच्या गोष्टी स्वप्नासारख्या समजाव्यात. त्या प्रचीतीस येतात पण नसतात. देहाशी असलेले आपले तादात्म्य हे एक प्रकारच्या सवयीने आणि अभ्यासानेच झालेले आहे. याच्या उलट अभ्यास करून भगवंताचे चिंतन केले तर जसे आज देहाशी तादात्म्य आहे त्याचप्रमाणे भगवंताशी आपले तादात्म्य होईल.


**१२. सकाळी उठताना, रात्र निजताना, जेवायच्या आधी, नाम घ्यायचेच आणि भगवंताची आठवण करायचीच असा नियम करावा. तो आयुष्यात फार उपयोगी पडेल.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

पिपिल मार्ग परिणाम फल, साधन कहा बुझाय । सुनो विहंगम मार्ग को, पारब्रह्म जिमि पाय ।।२०७।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय) ०६/०६/२०७

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :

ग्रंथकारांनी वरीलप्रमाणे विविध साधना-पथांचे तसेच त्यांच्या पासून प्राप्त होणाऱ्या परिणामांचे स्पष्ट वर्णन केले आहे. हे सर्व मार्ग पिपिल मार्गाच्या अंतर्गत येतात. ज्याप्रमाणे मुंगी कुठला तरी आधार पकडून हळूहळू आपल्या मार्गावर अग्रेसर होते, त्याप्रमाणे आत्तापर्यंत उल्लेखलेल्या सर्व साधना या इंद्रिय, अंतःकरण, प्राण तसेच अष्ट चक्रांच्या आधारावर चालतात आणि हे सर्व आधार प्राकृतिक आहेत. यांच्यामुळे परमात्मा प्राप्ति होत नाही, कारण परमात्मा हे प्रकृती पलीकडची चेतन सत्ता आहेत. आता ग्रंथकार विहंगम मार्गाचे वर्णन करत आहेत. पक्षाला विहंगम म्हणतात. पक्षी निराधार आकाशात उडत आपल्या गंतव्य स्थानी पोहोचतो तद्वतच आत्मा इंद्रियादि सर्व प्राकृतिक आधारांपासून पृथक् होऊन आपल्या चेतन सुरति द्वारे आत्म साक्षात्कार करतो. आत्मचेतनेला गुरूविधानाद्वारे उलटवून चेतन गगनात प्रवेश करून परब्रह्माचे प्रत्यक्ष दर्शन होते.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, १४ जून २०२४

adhunikkesari.com


# मुख्यमंत्री पदासाठी उद्धव ठाकरेंच्या नावाची घोषणा म्हणजेच काँग्रेसला नगण्य समजणे


## प्रवक्ता राम कुलकर्णींचा संजय राऊतांवर हल्ला


आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** आगामी लोकसभा निवडणुका दृष्टीक्षेपात ठेवुन खा.संजय



राऊतांनी उद्धवजी ठाकरे यांची मुख्यमंत्री पदासाठी केलेली घोषणा महाविकास आघाडीसाठी आवाहनात्मक असुन सोनिया काँग्रेस पक्षाला तर अस्तित्वहीन समजण्यासारखीच म्हणावी लागेल. महाविकास आघाडीत सोबत असताना स्वबळाचा नाराही देणं म्हणजेच लोकसभा निवडणुकीत आपलंच बाहुबल स्वत्वाने वाढल्याचे बोलुन जाणं असं म्हणावे लागेल. अर्थात काँग्रेस पक्ष मुख्यमंत्री पदाच्या घोषणेकडे कशा पद्धतीने पहातो ?येणारा काळ ठरवेल. मात्र वर्तमान राजकिय स्थितीत आपणच मोठा भाऊ असल्याचे अप्रत्यक्षरीत्या नाना पटोलेंना ठणकावुन सांगणं तथा इशारा देणं असच असल्याचे भाजप प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी म्हणत राऊतांवर जोरदार हल्ला चढवला. प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात कुलकर्णी म्हणतात की, लोकसभा निवडणुकीत ठाकरे गटाला मिळालेले यश खऱ्या अर्थाने





एकट्याचे नसुन काँग्रेस आणि शरद पवार गटाच्या कुबड्या होत्या म्हणुनच किमान 23 पैकी 09 जागा पदरात पडल्या. वास्तविक ठाकरे गटाचा स्ट्राईक रेटसुद्धा एक अंकी आकड्यात येवुन बसला. मात्र संजय राऊत लोकसभेला मिळालेले यशाचे श्रेय महाविकास आघाडीच्या सहकारी पक्षाला द्यायलाच तयार नाहीत. युतीमध्ये असताना एक पाऊल पुढे टाकणं हा त्यांचा मुळ स्थायी स्वभाव जो की आता काँग्रेसवाल्यांच्या लक्षात येवु लागला. आम्ही मोठ्या भावाच्या भुमिकेत ही ठाकरे गटाने घेतलेली भुमिका खरं तर काँग्रेस पक्षाला आवाहन म्हणुनच समजायला हरकत नाही. एवढेच नाही तर काल 288 विधानसभा मतदारसंघाचा आढावा ठाकरे गटाने घेतल्यानंतर चार महिन्यानंतर होवु घातलेल्या विधानसभा निवडणुका दृष्टीक्षेपात घेवुन संजय राऊतांनी उद्धव ठाकरे यांची मुख्यमंत्री पदासाठी घोषणा करणं खरं तर महाविकास आघाडीतल्या दुधाच्या मिठात खडा टाकल्यासारखंच म्हणावे लागेल. दुसरी बाजु लोकसभेचं यश स्वबळावर असल्याची प्रत्यक्ष कृती दाखवताना ठाकरे गट राज्यात काँग्रेस पक्षाला नगण्य समजतो की काय? असा देखील संशय निर्माण होवु शकतो. कारण मोठ्या भावाच्या भुमिकेत आलेला काँग्रेस पक्ष राज्यात अवसानगलित गात्र असल्याचं ठणकावुन राऊत चित्र समोर आणताना दिसतात. खरं तर स्वाभिमानाचं राजकारण करणारे काँग्रेस प्रदेश अध्यक्ष नाना पटोले मुख्यमंत्री पदाचं नाव ठाकरेचे जाहिर झाल्यानंतर देखील तोंडाला चिकटपट्टी लावुन बसले. त्या मागचं रहस्य कळत नसलं तरी पाच दिवसापुर्वी पटोलेंच्या कुटुंबियातुन देखील मुख्यमंत्री नाना व्हावे अशा प्रकारची इच्छा माध्यमांसमोर आलेली होती. कदाचित त्याला उत्तर म्हणुन देखील संजय राऊतानं उद्धवजीचं नाव पुढे केलं असावं. दुसऱ्या बाजुने शरद पवार राष्ट्रवादी गटातुन अनेकांच्या नावाची देखील चर्चा आहे. मात्र महाविकास आघाडीच्या धर्माचं पालन न करता स्वबळाची ताकद आजमावण्याची भाषा करणं नव्हे तर थेट मुख्यमंत्री पदाचा उमेदवार जाहिर करणं याचा दुसरा अर्थ काँग्रेस पक्षाला नगण्य समजणं आणि शरद पवार राष्ट्रवादी पक्ष यांच्यासोबत अंतर्मनाने जुळवुन घेणं या प्रयत्नात संजय राऊतांच्या उचापती सुरू झालेल्या नक्कीच लक्षात येतात. दुसरीकडे सत्तेवर असलेल्या महायुतीच्या एकाही घटक पक्षाने मुख्यमंत्री पदाचा चेहरा या विषयावर अद्याप चर्चा देखील चालु केलेली नाही. संजय राऊतांनी टाकलेला बॉल कदाचित नाना पटोलेंना क्लिन बोल्ड करण्यासाठीच असावा हे न कळण्यापुरती जनता दुधखुळी नसल्याचा आरोप भाजपा प्रवक्ता राम कुलकर्णी यांनी ठाकरे गटावर लावला.

# ज्ञानराधाच्या ठेवीदारांचा पैशाचा मार्ग मोकळा

## आयसीआयसीआय बँकेकडे आला अधिकृत मेल



आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या ठेवीदारांसाठी पैशाचा मार्ग मोकळा झाला असून आयसीआयसीआय आणि संबंधित कंपनी यांच्यामध्ये कम्युनिकेशन झाल्याचा मेल नुकताच प्राप्त झाला आहे यामुळे येत्या दोन दिवसात ठेवीदारांना पैसे मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. गेल्या काही महिन्यांपासून ज्ञानराधा मल्टीस्टेट अडचणीत सापडल्यामुळे ठेवीदारांचे पैसे देण्यास विलंब होत # आहे. मात्र यातून मार्ग काढत ठेवीदारांसाठी पैशाची व्यवस्था केली असून गेल्या दोन दिवसांपासून यामध्ये मोठ्या प्रमाणावर हालचाली सुरू होत्या बुधवारी सायंकाळी संबंधित कंपनीकडून आयसीआयसीआय बँकेकडे मेल प्राप्त झाला असून तांत्रिक अडचणी दूर करून येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये ठेवीदारांच्या खात्यावर थेट पैसे देण्याची प्रक्रिया ज्ञानराधाच्या वतीने सुरू करण्यात येणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाले आहेत. ठेवीदारांनी काही दिवसांसाठी संयम ठेवून ज्ञानराधा मल्टीस्टेट च्या प्रशासनाला सहकार्य केल्यास ठेवीदारांचे पैसे मिळण्याचा मार्ग मोकळ्या होण्याची शक्यता आहे.

# कोकणात पावसाचा जोर वाढला

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सिंधुदुर्ग जिल्ह्यात काही ठिकाणी मुसळधार पाऊस तर काही ठिकाणी संततधार पाऊस सुरू आहे. कणकवली, कुडाळ सावंतवाडीसह जिल्ह्याच्या इतरही भागात पाऊस सुरू असून काही ठिकाणी सखल भागात पाणी साचण्यास सुरुवात झाली आहे. पावसामुळे हवेत चांगलाच गारवा निर्माण झाला आहे. हवामान विभागाने आज रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी केला आहे. तसेच मुसळधार पावसाचा इशारा देखील दिला आहे. आयएमडीच्या अंदाजानुसार, रत्नागिरीतही पावसाची जोरदार बँटींग सुरु आहे. बारामती तालुक्यातील कन्हेरी गावात ढगफुटी सदृश पाऊस झाल्याने शेतकऱ्यांसह ग्रामस्थांची तारांबळ उडाली आहे. बुधवारी रात्री झालेल्या पावसामुळे अनेकांच्या घरात पाणी शिरलं. त्यामुळे नागरिकांना अचानक आलेल्या पावसामुळे काय करावे आणि काय नको अशी अवस्था येथील ग्रामस्थांची झाली होती. बारामतीतील याच कन्हेरी गावात जागृत हनुमान मंदिर आहे, पवार कुटुंबीय आपल्या प्रचाराचा शुभारंभ याच मंदिरातून करत असतात.

पावसानंतर हिंगोली जिल्ह्यात पेरणीच्या कामांना वेग आला आहे. हिंगोली जिल्ह्यांमध्ये परवा जोरदार स्वरूपाचा पाऊस झाल्यानंतर शेतामध्ये पेरणीच्या कामाला वेग आला आहे. हळद सोयाबीन कापूस या पिकांच्या लागवडीसह पेरणीचे काम शेतामध्ये सुरू आहेत. यावर्षी हळदीला चांगला भाव मिळाल्यानंतर हळदीच्या क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे. हळद, कापूस आणि सोयाबीन या पिकांचे गतवर्षीपेक्षा यावर्षी क्षेत्र वाढण्याची शक्यता आहे. बीडच्या माजलगांव तालुक्यातील कोथाळा येथील सरस्वती नदीला पूर आल्याने नागरिकांचा जीवघेणा प्रवास सुरू आहे.

कोथाळा आणि सिरसाळा गावाचा संपर्क तुटला आहे. मागील तीन दिवसापासून मान्सूनचं आगमन झालं. मंगळवारी रात्री तालुका परिसरात दमदार संततधार पाऊस झाल्याने माजलगांव तालुक्यातील कोथाळा येथील सरस्वती नदीला पूर आल्याने नागरिकांना जीवघेणा करावा लागत आहे. कोथाळा येथील सरस्वती नदीला पाऊसामुळे पुर आल्याने पूलावरुन पाणी वाहत असल्याने सिरसाळ्याला जाणारा रस्ता बंद झाला आहे. यावर्षी चांगला पाऊस पडण्याची अंदाज हवामान विभागाने वर्तविलेला असून मागील तीन ते चार दिवसांपासून पाऊसाला सुरुवात झालेली आहे.




## एनडीएत मतभेद

आधुनिक केसरी

समान नागरी कायदा हा भारतीय जनता पक्षाच्या निवडणूक जाहीरनाम्यातील महत्त्वाचा मुद्दा राहिला होता. निवडणुकीच्या आधीही समान नागरी कायद्यावरून बराच वाद आणि चर्चा झाल्यानंतर आता पुन्हा एकदा त्या मुद्द्यावरून सत्ताधारी पक्षांमध्येच सुंदोपसुंदी पाहायला मिळण्याची शक्यता आहे. भाजपाला स्वबळावर सत्ता मिळवण्याइतपत संख्याबळ न मिळाल्यामुळे नितीश कुमार यांचा जदयू आणि चंद्राबाबूंचा तेलुगू देसम पक्ष यांच्या पाठिंब्यावर भाजपाने केंद्रात एनडीएचे सरकार स्थापन केले आहे. मात्र, आता भाजपाच्या अजेंड्यावरील विषयांवर मित्रपक्षांकडून वेगळी भूमिका घेतली जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. समान नागरी कायद्यावर देशभरात झालेल्या चर्चेनंतर भाजपाने निवडणूक जाहीरनाम्यात त्याचा समावेश केला होता. त्यामुळे एनडीएचं सरकार केंद्रात आल्यानंतर हा विषय ऐरणीवर येणार अशी शक्यता वर्तवली जात होती. यासंदर्भात नुकतंच कायदा व न्याय राज्यमंत्री स्वतंत्र पदभार असणारे अर्जुन राम मेघवाल यांनी विधान केलं होतं. मात्र, त्याचवेळी नितीश कुमार यांच्या जदयूचे राष्ट्रीय सरचिटणीस के. सी. त्यागी यांनी समान नागरी कायद्यासंदर्भात घेतलेली भूमिका तर्क-वितर्कांना उधाण देणारी ठरली आहे. अर्जुन राम मेघवाल यांनी यासंदर्भात माध्यमांशी बोलताना वक्तव्य केले. समान नागरी कायदा हा मुद्दा अजूनही केंद्र सरकारच्या अजेंड्यावर आहे. यासंदर्भात इतरांनी वेट अँड वॉचची भूमिका घ्यावी, असे मेघवाल म्हणाले. मेघवाल यांच्या या विधानाविषयी विचारणा केली असता केंद्रातील महत्त्वाचा मित्रपक्ष असणाऱ्या जदयूने वेगळी भूमिका मांडली आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी २०१७ सालीच विधी आयोगासमोर यासंदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली आहे. आमची तीच भूमिका कायम आहे. आम्ही समान नागरी कायद्याच्या विरोधात नाही. पण जो काही निर्णय होईल, तो सर्वसहमतीने व्हावा अशी आमची भूमिका आहे, अशी प्रतिक्रिया के. सी. त्यागींनी इंडियन एक्स्प्रेसला दिली आहे. जदयूनं सुरुवातीपासूनच समान नागरी कायद्याबाबत आपली भूमिका कायम ठेवली आहे. समान नागरी कायद्याकडे आपण सुधारणांचा एक मार्ग म्हणून पाहायला हवे. ते राजकीय हत्यार होऊ नये, अशी भूमिका जदयूने घेतली आहे. त्याचवेळी एनडीएतील दुसरा प्रमुखपक्ष असलेल्या तेलुगू देसमने समान नागरी कायद्यासारख्या मुद्द्यांवर एकत्र बसून चर्चा करून तोडगा काढायला हवा", अशी भूमिका घेतली आहे. नितीश कुमार यानी विधी आयोगाला सात वर्षांपूर्वी पत्र लिहून समान नागरी कायद्यासंदर्भातली आपली भूमिका मांडली होती. केंद्राने समान नागरी कायदा अंमलात आणण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. पण या गोष्टी शाश्वत आणि परिणामकारक ठरण्यासाठी त्या थेट वरून लादल्या न जाता त्यावर व्यापक सहमती गरजेची आहे, असे नितीश कुमार यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

## शेजारणीच्या घरात संजय राऊत कुठपर्यंत वाकून पाहणार ?

आधुनिक केसरी

**मराठीत काही म्हणी आहेत. आपलं ठेवायचं झाकुन, दुसऱ्याचं बघायचं वाकुन याप्रमाणे उपरोधक म्हणुन प्रचलित शब्द आणि काहींचे स्वभाव असतात. अनेकांना आपल्या घरात काय चाललंय?त्यापेक्षा खिडकीतुन शेजाऱ्याच्या घरात काय चाललंय? हे वाकुन बघायची सवय असते. त्यापैकीच ठाकरे शिवसेनेचे मुख्य प्रवक्ते संजय राऊताचं होवुन बसलं असं म्हणता येईल. त्यांच्या राजकिय घरात अनेक आवाहने असताना सतत आमच्या अर्थात भाजपाच्या घरात खिडकीतुन पाहणारी शेजारीण असा त्यांचा उल्लेख करता येईल.**

. त्यांच्या गटात पक्षांतर्गत कुरबुऱ्या मोठ्या प्रमाणावर आहेत. लोकसभा निवडणुकीत त्यांच्या जागा 09 आल्या असल्या तरी 18 वरून निम्यावर आले अर्थात काँग्रेस आणि शरद पवारांच्या कुबड्या घेवुन. महाविकास आघाडीतुन बाहेर पडले तर जनमतात स्ट्राईक रेट त्यांचा एक अंकीसुद्धा नाही. सांगली लोकसभा निवडणुकीत त्यांचा उमेदवार चंद्रहार पाटलाचा पराभव त्यांच्याच सहकाऱ्यांनी केला. मोठा भाऊ का लहान भाऊ हा वाद त्यांच्या बोलण्यातुन लागला. लोकसभेच्या निवडणुकीत अनेक मतदारसंघात महाविकास आघाडीच्या लोकांनी त्यांचे उमेदवार पराभुत केले. विधानसभेला त्यांना सर्वच्या सर्व जागा लढवायच्या आहेत. उद्धव ठाकरेच मुख्यमंत्री होणार अशी घोषणा देखील त्यांनी केली. शासकिय स्तरावर भ्रष्टाचाराच्या चौकशा त्यांच्या सुरूच आहेत. असं सारं असताना सतत भाजपाच्या राजकिय घरात डोकावुन पहायचं आणि रोज पंतप्रधान नरेंद्रजी मोदी राज्यात देवेंद्रजी फडणवीस यांच्यावर टिका करायची, मी बोलेन ते खरं, मी लिहिन ते खरं हा त्यांच्या अंगी असलेला अहमपणा अर्थात एनडीएला बहुमत मिळुन देखील, केंद्रात तिसऱ्यांदा पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांची नियुक्ती होवुन देखील हा माणुस लोकमताचाही अनादर करून बोगस लोकशाही असल्याचे स्वतः जाहिर करतो. अर्थातच मीच राज्याचा मुख्यमंत्री स्वप्नाच्या रात्री दिवाळी साजरी करण्यासारखा त्यांचा स्वभाव खऱ्या अर्थाने राजकिय संस्कृती बिघडवुन टाकणारा वाटतो.



संजय राऊतांची मानसिकता विक्षिप्त आहे का? हा प्रश्न जर सामान्य माणसाला विचारला तर खऱ्या अर्थाने होकारार्थी उत्तर येवु शकतं. कारण त्यांना मुळात प्रसिद्धीचे व्यसन जडले असुन रोज सकाळी 9 वाजता उठल्याबरोबर काहीतरी बिनधास्त आणि बिनबुडाची बातमी ज्यामुळे दिवसभर आपलं नाव चर्चेत कसं राहिल? हा प्रयत्न त्यांचा सुरू असतो. मागे वळुन पाहिलं तर 22 वर्षाची भाजपा-शिवसेना युती तोडुन टाकण्याची जबाबदारी त्यांच्यावर जाते. 2019 ला हिंदुत्वाला समुद्रात फेकुन महाविकास आघाडी केवळ मुख्यमंत्री पदाच्या आकांक्षेपोटी तयार करण्यातही त्यांचाच वाटा. अर्थात स्वतःला मुख्यमंत्री हे स्वप्न देखील त्यांना पडतात. सत्तेचा गैरवापर अशा प्रकारचा आरोप नेहमीच विद्यमान राज्य सरकार आणि केंद्र सरकारवर करणारे राऊत मध्यंतरी सत्तेत असताना त्यांनी कसा गैरवापर केला याचे अनेक उदाहरणे लोकांनी पाहिले. 100 कोटीच्या आरोपात अनिल देशमुख जेलमध्ये गेले. पत्राचाळ प्रकरण त्यांच्याभोवती फिरतच आहे. मुख्यमंत्री मंत्रालयात अडीच वर्षात एकदाच गेले. अनेक पत्रकार, विचारवंत, लेखकाला त्यांनी जेलमध्ये टाकले. नारायण राणे मंत्री असताना रात्रभर पोलीस ठाण्यात ठेवले. नवनित राणासारख्या महिला खासदाराला सत्तेचा गैरवापर करतच जेलात सडवुन ठेवलं. त्यांचे अनेक उदाहरणे देता येतील. आज नाक वरून नैतिकतेच्या गप्पा मारणाऱ्या राऊतांनी अडीच वर्षे महाविकास आघाडीसोबत सत्तेत असताना कसा कारभार केला? हे लोक विसरले नाहीत. नुकत्याच लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला यश मिळालं पैकी ठाकरे शिवसेनेला 09 जागा मिळाल्या. त्याचं संपुर्ण श्रेय संजय राऊत स्वतःकडे घेत असले तरी त्यांना शरद पवार आणि सोनिया गांधींच्या कुबड्या होत्या म्हणुनच यश मिळालं. सर्वाधिक जागा 23 पैकी 09 पदरात पडल्या. इतरांच्या तुलनेत त्यांचा स्ट्राईक रेट एक अंकी म्हणावा लागेल. कारण मागच्या वेळी 18 पैकी 09 जागा आल्या. बाहेर पडलेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाने 10 पट स्ट्राईक रेट त्यांचा ठेवला. खरं तर लोकसभा निवडणुकीनंतर संजय राऊत स्वतःची ताकद प्रचंड वाढली या गैरसमजात असुन काँग्रेस पक्षाला नगण्य समजु लागले. त्यातुनच मोठा भाऊ, लहान भाऊ उपाधीनं ऊर बडवुन घेऊ लागले अर्थात नाना पटोलेंनी त्यांच्या भाऊबंदकीवर धडाकेबाज उत्तर देवुन खिल्ली उडवली तो भाग वेगळा. देशात एनडीएला 293 जागा मिळुन बहुमत आलं. इंडी आघाडीला एकुण 237 जागा तर दुसऱ्या बाजुने एकट्या भाजपाला 242 जागा असं चित्र समोर असताना स्वतःला मीच जणु काही लोकशाहीचा रक्षणकर्ता या आविर्भावात बोलणाऱ्या राऊतांना मोदीजींनी तिसऱ्यांदा पंतप्रधान पदाची शपथ घेतली तरी ती लोकशाही त्यांना मान्य नाही. खरं तर बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमारांना या राऊतांनीच लोकसभा निवडणुक पुर्व पंतप्रधानाचा चेहरा होवु दिला नाही. त्या नितीशकुमारांवर आरोप लावताना यांना काही वाटत नाही. काय तर म्हणे चार महिन्यात केंद्र सरकार जाणार? स्वतःला आंतरराष्ट्रीय किर्तीचे भविष्यकार समजणाऱ्या राऊतांनी राज्यात शिंदे-फडणवीस-पवार सरकार स्थापन झाल्यापासुन नेहमीच एक महिना, दोन महिना तारखा दिल्या. विधानसभेच्या निवडणुका तोंडावर आल्या तरी सरकार पडलं नाही. याचाच अर्थ काही तरी वेग बोलायचं आणि राळ उठवुन द्यायची हे लागलेले व्यसन केवळ प्रसारमाध्यमाचा बातमीचा भाग म्हणुन लोक आता पाहताना दिसतात. पंतप्रधान पदाच्या व्यक्तीचा अवमान करणं असेल किंवा कुठलीही व्यवस्था माझ्यासमोर नगण्य हा त्यांच्या अंगी असलेला अहंकार खऱ्या अर्थाने हिटलरवादी स्वभावापैकीचा सद्गुणच म्हणावा लागेल. महाराष्ट्राची राजकिय संस्कृती केवळ त्यांच्या आरोप-प्रत्यारोपाच्या बोलघेवड्या स्वभावातुन रसातळी जात असताना दिसते. आपण बोलुन काय गेलो? याचे भान देखील त्यांना रहात नाही. 2020-21 मध्ये त्यांनी पंतप्रधान पदासाठी शरद पवारांच्या नावाचा जाहिर उल्लेख केला होता. लोकसभा निवडणुकीनंतर राहुल गांधीचे नाव त्यांनी पुढे केलं. पवार साहेबांचे नाव विरोधी पक्ष नेता पदासाठी सुद्धा त्यांनी घेतलं नाही. याचाच अर्थ जसं चित्र डोळ्यासमोर येईल, त्या वाहत्या राजकिय पाण्याच्या प्रवाहात फक्त डुबकी मारण्याचं काम हे नेते करतात. ज्यांची एक बातमी रोज माध्यमासाठी होते पण करमणुक म्हणुन लोक बघतात. त्यांच्या अंतर्गत असलेल्या अनेक संकटाच्या आवाहनांचा ऊहापोह होवु द्यायचा नाही. पण दुसऱ्याच्या घरात मात्र शेजारीण म्हणुन रोज ढुंकुन बघायचं. ही त्यांची सवय सुसंस्कृत राजकारणाला अत्यंत घातक म्हणावी लागेल. खरं तर लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षामुळे त्यांच्या जागा आल्या. पण सन्मानाने राऊत काँग्रेसचे उपकार मानायला तयार नाहीत. याउलट लहान भाऊ, मोठा भाऊ ही चर्चा पुढे आली. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे सांगलीत त्यांनी अधिकृत उमेदवारी चंद्रहार पाटलाला दिली होती. तो उमेदवार दिवसाढवळ्या त्यांचे सहकारी असलेल्या काँग्रेस पक्षानं पडद्याआड काम करून पहिलवान असलेला राजकिय मैदानात आपटुन टाकला. अपक्ष उमेदवार निवडुन आणला. त्यावर संजय राऊत एक शब्दही काढत नाहीत. खरं तर त्यांनी चंद्रहार पाटील यांचा पराभव झाला तर आम्ही जबाब विचारू असं जाहिर केलं होते. मात्र निवडणुकीनंतर त्या प्रश्नावर तोंडाला चिकटपट्टी राऊतांनी लावली. संघाच्या मुखपत्रामध्ये सुचनावजा काही मतं मांडली गेली तर तो प्रश्न भाजपाच्या अंतर्गत विचाराचा आहे. मात्र त्यातही राऊतांनी नाक खुपसत भाजपावर तथा संघावर केलेली टिका शेजारणीनं खिडकीतुन डोकावल्यासारखीच म्हणावी लागेल. खरं तर विधानसभा निवडणुक वेळप्रसंगी ठाकरे गटाला एकट्यानेच लढावी लागणार, काँग्रेस त्यांच्यापासुन सावध रहाण्याची शक्यता वाटते. मोठे मोठे आवाहने असताना आपलं ठेवायचं झाकुन, दुसऱ्याचं बघायचं वाकुन.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

## जीवनातील स्थिरता अस्थिरता ही ज्ञान अज्ञान स्थितीवर अवलंबून

आधुनिक केसरी

**आपल्या जीवनात आपली अवस्था हि आपल्या ज्ञान अज्ञान स्थिती वर अवलंबून असते. वेळ काळ परस्थिती स्थिती कोणतीही असो परिपुर्ण ज्ञान हेच जीवनातील सर्व दुःखावर गुणकारी औषध ठरत. आपल्याला मिळालेला मनुष्य देह हा काही फक्त सुखाचा उपभोग घेण्यासाठी झालेला नसुन बहुतांश दुःख पण निश्चित वाट्याला येणार आहेत याची जाणीव ठेवून ज्या पद्धतीच दुःख आहे. त्या पद्धतीचे उच्च ज्ञान आपल्याकडे असले पाहिजे जेणेकरून दुःख आल तरी ते आपल्या जीवनावर फार मोठा प्रभाव निर्माण करू शकला नाही पाहिजे तेव्हाच ते ज्ञान आपल्यासाठी उपयोगी ठरते. परिपुर्ण ज्ञान हेच सर्व दुःखावर प्रभावी गुणकारी औषध आहे ज्याचा वापर आपण आपलं जीवन स्थिर ठेवण्यासाठी करू शकतो.**

आपण ज्या बाबीला सुख समजतो त्याच बाबी दुःखाचं मुळ ठरतात. आपण आपल्या ज्ञान उंची नुसार सुख दुःख ठरवतो.पण वास्तविक सत्य काय आहे हे आपण जाणून घेत नाहीत.सत्य जाणून घेण्यासाठी आपल्या कड मजबूत अस प्रभावी ज्ञान असलं पाहिजे. ज्ञान अवस्था मजबूत असेल तर दुःख आपल स्थान आपल्या जीवनात निर्माण करू शकत नाही ज्ञान उंची कायम ठेवली तर सदैव आपली अवस्था स्थिर राहते .मुळात अवस्था म्हणजे काय? तर अवस्था म्हणजे दशा अथवा हालत एकंदरीत जीवनाच मुल्यमापन काढलं तर जीवन स्थिती निश्चित होते.आणि हि स्थिती अवस्था हि आपल्या ज्ञान ,अज्ञानावर ठरत असते आपल्या जीवनात निर्माण होणारी स्थिरता अस्थिरता सुख दुःख हे आपल्या ज्ञान स्थितीवरच अवलंबून असते.परीपुर्ण ज्ञान दुःख मुक्त जीवन अर्धवट ज्ञान असेल तर अस्थिर दुःखी जीवन मग जीवनात नेमकं मिळविण्या सारखं काही असेल तर पुर्ण ज्ञान हेच जीवनासाठी हितार्थ ठरत मानवी जीवन हे क्षणभुंगर असलं तरीही जो पर्यंत जीवन आहे तो पर्यंत जीवनचक्र चालू असत .मग जीवन चक्र आलं कि त्या सोबत आकांक्षा महत्वाकांक्षा,मोह,माया ,स्वार्थ,हे सगळं आलंच या सगळ्या सोबत दुःख हे येणारच मग या दुःखाच्या चक्रव्युहातुन कायमची मुक्ती मिळविण्यासाठी पुर्ण ज्ञान आवश्यक असतं तसं पाहिलं तर जीवनाची स्थिती हि फक्त ज्ञानानुसारच निश्चित होत असते.आपण समस्येला घाबरत असतो. पण समस्या हि कधीच मोठी नसते.उपाय माहित नसतो म्हणून समस्या हिच खुप मोठी अडचण भासते.समस्या अडचण या सोबत खेळत बसण्यापेक्षा उपया शोधुन मार्गक्रमण करण हे कधीही हितकारक ठरत.जीवनातील सुख दुःखाची निर्मिती हि ज्ञान आणि अज्ञानावर अवलंबून असते .या गुह्य ज्ञाना पासुन आपण वंचित असल्या कारणाने सुख दुःखाच्या फेरयात आपण सहजपणे अडकतो. जीवन म्हटलं कि समस्यांचा महासागर आणि महासागरात तरूण जाण्यासाठी ज्ञान हेच उपयुक्त प्रभावी असं माध्यम आहे.जीवनात समस्या अडचणी दुःख अनंत आहेत पण त्या अनुषंगाने असणारे पुर्ण ज्ञान हेच त्यावरील उपयुक्त प्रभावी औषध आहे. परीपुर्ण ज्ञान हे जीवनातील सर्व दुःख संपवुन समाधान स्थिरता निर्माण करते.तर अर्धवट ज्ञान हे जीवनातील सर्वात घातक ठरत.अस्थिरता निर्माण करत म्हणून जीवनाची दिशा आणि दशा हि सर्वस्वी आपल्या ज्ञानावर अवलंबून असते.आपलं जीवन कसं आहे हे आपल्या ज्ञान स्थिती वर आधारित असल्याने जीवनातील स्थिती बदलण्यासाठी आवश्यक ज्ञान अर्जित करणं गरजेचं आहे.तस पाहिलं तर सृष्टी वर उपलब्ध ज्ञान हे अनंत आहे त्या पैकी आपण जितकं जास्ती जास्त ज्ञान गृहण करू शकु तितकंच आपली वैचारिक स्थिती मजबूत होणार हे निश्चित आहे.जीवनाशी निगडित विषय अनेक आहेत त्या अनेक विषयांपैकी आपण ज्या क्षेत्राशी निगडीत आहेत त्यामधील संपुर्ण ज्ञान आपल्याला असेल अथवा एकंदरीत जीवनाविषयीच जरी संपूर्ण ज्ञान आपल्याकडं असलं तरी कसलंच दुःख आपल्या जीवनात प्रवेश करत नाही.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# नीट २०२४ निकालात महाराष्ट्रात आयआयबीच अव्वल!

## १०० टक्के ओरिजनल निकालामुळे विद्यार्थी पालकांना आयआयबीचा विश्वास!

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर / नांदेड :** लातूरच्या शैक्षणीक क्षेत्रात गुणवत्तेचा पॅटर्न निर्माण करून त्याचा दबदबा संपूर्ण राज्यात केलेल्या व महाराष्ट्राचा महाब्रँड म्हणून ओळख निर्माण केलेल्या आयआयबीने ४ जून रोजी जाहीर झालेल्या नीट २०२४ च्या निकालात ऐतिहासिक कामगिरी करत गुणवत्तेचा एक नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे. या वर्षीच्या निकालात आय आय बी इन्स्टिट्यूटचा सिंद्धात राख याने ७१० गुण मिळवत सर्वोत्तम स्थान प्राप्त केले आहे तर यासोबतच आयआयबी च्या तब्बल ६ विद्यार्थ्यांनी ७०० पेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा आय आय बी ने आपली गुणवत्ता सिद्ध करत नवा गुणवत्तेचा बेंचमार्क सेट केला आहे.




आयआयबीच्या ७०० पेक्षा अधिक गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यांत ऋुषीकेश गायकवाड ७०५, ओम येसने ७०५, कु.प्राजक्ता भगत ७००, महेश सत्यधर ७००, कु.सानिया मिरजे ७०० या विद्यार्यांनी बाजी मारली असून याशिवाय इन्टिट्यूटच्या तब्बल २२५ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी ६५० पेक्षा अधिक गुण मिळविले आहेत यासह फिजिक्स, केमिस्ट्री, बायोलॉजी या विषयात पैकीच्या पैकी गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ही मोठ्या प्रमाणात आहे. एकंदरीत निकालावरून नीट २०२४ च्या निकालात महाराष्ट्रासह देशात गुणवत्तेचा अमीट ठसा आयआयबी इन्स्टिट्यूटने उमटविला आहे . या कामगिरीच्या बळावर याही वर्षी आयआयबी हे महाराष्ट्रातून एमबीबीएसला सर्वाधिक विद्यार्थी पाठविणारे इन्टिट्यूट ठरणार आहे. सलग २५ वर्षापासून "आयआयबी आहे तर विश्वास आहे" हे वाक्य केवळ बिरुद नाही तर या निकालाने ते सिद्ध देखील झाले आहे. त्यामुळे आय आय बी संधर्भात गुणवत्तेचा ओरिजनल विश्वास हे समीकरण आणखी बळकट होत आहे. दरवर्षी मे महिन्यात नॅशनल टेस्टिंग एजन्सी एनटीए कडून या परिक्षेचे आयोजन केले जाते.

यावर्षीही ५ मे रोजी देशभरात ही परीक्षा पार पडली आहे.नीटचा निकाल ४ जून रोजी घोषित करण्यात आला आहे. त्यात सर्व विषयात पैकीच्या पैकी गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही मोठी आहे. तसेच ६५० पेक्षा अधिक गुण घेणारे २२५ पेक्षा जास्त विद्यार्थी असून यावर्षीही आयआयबी च्या सर्वाधिक विद्यार्थ्यांना एमबीबीएस प्रवेश मिळेल असे संचालक दशरथ पाटील यांनी निकालावर प्रतिक्रिया देतांना सांगितले.



# घरासमोर गटार तुंबल्याने आरोग्य धोक्यात

## पुनर्वसित सिनगाव जहागीर ग्रामपंचायतचे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** खडकपूर्णा प्रकल्प पुनर्वसित सिनगाव जहागीर नवीन गावठाणात सुमार दर्जाचे पुनर्वसन कामे झाली आहे. परिणामी नागरिकांच्या समस्या वाढल्या असून दुर वरून वाहत आलेल्या गटारीचे सांडपाणी घरासमोर तुंबल्याने दुर्गंधी पसरली आहे. यामुळे कुटुंबाचे आरोग्य धोक्यात आले असून या समस्येचे निराकरण करा अन्यथा पंचायत समिती समोर उपोषणाला बसण्याचा इशारा सुधाकर पवार यांनी दिला आहे.

पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आणि शिनगाव जहागीर ग्रामपंचायत चे ग्रामविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात सिनगाव जहाँ येथील सुधाकर राजाराम पवार यांनी नमूद केले आहे की, माझ्या घरासमोर दूर वरून सांडपाण्याची नाली वाहत येते, सदर नाली माझ्या घरासमोर पुर्ण झालेली असल्याने नालीचे सांडपाणी घरासमोर तुंबते. दुर्गंधीयुक्त गटारीचे पाणी घरासमोर तुंबल्याने साथीचे रोग पसरण्याची भीती निर्माण झाली असून दुर्गंधी मुळे घरात राहणे ही आमच्या कुटुंबाला कठीण झाले आहे.पावसाळ्यात हिवताप आणि डेंग्यू रुग्णांची संख्या वाढत असते तरी सुद्धा ग्रामपंचायत प्रशासन याकडे दुर्लक्ष करत आहे.

ग्रामपंचायत च्या दुर्लक्षपणामुळे सदर सांडपाण्याचे निकाशी होत नसून पावसाळ्यात घरात जाण्यासाठी रस्ताच राहिला नाही. सदर प्रकाराची घटनास्थळी पाहणी करून तात्काळ घरासमोर तुंबलेल्या दुर्गंधीयुक्त पाण्याची विल्हेवाट लावण्याचे आदेश ग्रामपंचायतला देण्यात यावे अशी मागणी सुधाकर पवार यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे केली आहे. सदर निवेदनाची एक प्रत ग्राम विकास अधिकारी यांनाही देण्यात आली असून तात्काळ या समस्या सोडविण्यात आल्या नाही तर पंचायत समिती समोर उपोषणाचा इशारा निवेदनकर्ते यांनी दिला आहे.

# स्मार्टमीटर विरोधात चळवळ उभी करणार

## युवासेनेचे कल्पेश चव्हाण यांचा निर्वाणीचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** राज्यातील 2.25 कोटी वीज ग्राहकांना स्मार्ट प्रीपेड मीटर्स लावण्यासाठी 27000 कोटी म्हणजे प्रति मीटर 12000 खर्च केले जाणार आहेत आणि यापैकी फक्त 2000 कोटी म्हणजे प्रति मीटर फक्त १०० रुपये अनुदान केंद्र सरकारकडून मिळणार आहे. उरलेली सर्व रक्कम महावितरण कंपनीला कर्जरूपाने उभी करावी लागणार आहे आणि हे कर्ज व त्यावरील व्याज, घसारा, संबंधित अन्य खर्च इ. सर्व खर्चाची भरपाई राज्यातील सर्व वीजग्राहकांना दरवाढीच्या रूपाने मोजावी लागणार आहे असे ह्या निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे 1 एप्रिल 2025 पासून प्रत्येक ग्राहकाच्या वीज बिलामध्ये प्रति युनिट किमान 30 पैसे वाढ होणार हे निश्चित आहे. 'नॅशनल स्मार्ट ग्रीड मिशन' या मोहिमेअंतर्गत सर्वसामान्य ग्राहकांच्या प्रत्येक मीटर मागे फक्त 900 रुपये अनुदान देणार आहे. त्या आधारावर व केंद्र सरकारचा आदेश म्हणून महावितरण कंपनीने राज्यातील 2 कोटी 25 लाख मीटर बदलण्यासाठी 27,000 कोटी रुपयांची टेंडर्स मंजूर केलेली आहेत. ही टेंडर्स मंजूर करताना ग्राहकांना मोफत मीटर्स बसविणार अशी फसवी जाहिरात करण्यात आलेली आहे. प्रत्यक्षात अनुदान रक्कम वगळता उरलेली 25,000 कोटी रुपयाची रक्कम येणाऱ्या वीजदरनिश्चिती याचिकेमध्ये कंपनी आयोगाकडे मागणी करणार आणि आयोगामार्फत मंजुरी मिळाल्यानंतर त्या प्रमाणात वीज दरवाढ होणार आहे. त्यामुळे 1 एप्रिल 2025 पासून ग्राहकांना प्रति युनिट किमान 30 पैसे अथवा अधिक फटका बसणार आहे, असे निवेदनात म्हटले.

स्मार्ट मीटर म्हणजे 'नाल सापडली म्हणून घोडा खरेदी' करण्याचा प्रकार आहे. पुन्हा या घोड्याची म्हणजे मीटर्सची मालकी आज महावितरण कंपनीची आणि उद्या राज्यामध्ये येऊ घातलेल्या सर्व खाजगी वितरण परवानाधारकांची होणार आहे. म्हणजे अदानी, एनसीसी, मॉटेकार्लो आणि तत्सम बड्या भांडवलदारांच्या फायद्यासाठी सुरु केलेली ही योजना हा खाजगीकरणाचा एक पुढचा टप्पा आहे. त्यामुळे सर्वसामान्य वीज ग्राहकांच्या दृष्टीने कोणताही उपयोग नसलेल्या या स्मार्ट प्रीपेड मीटरची सक्ती सर्वसामान्य ग्राहकांच्यावर करता कामा नये, यासाठी सर्वांनी या प्रीपेड मीटर सक्तीच्या विरोधात चळवळ आणि आंदोलन मोहीम चालवावी, असे आव्हाहन धुळे युवासेनेचे महानगरप्रमुख कल्पेश चव्हाण यांनी केले आहे.



# कापड बाजारातील कचऱ्यामुळे व्यापारी संतप्त; आंदोलनाची तयारी




आधुनिक केसरी न्यूज

**अहिल्यानगर :** अहिल्यानगरच्या कापड बाजारात सर्वत्र पडून राहिलेल्या कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरली आहे. या समस्येवर व्यापारी महासंघ व कापड बाजार व्यापारी एसोसिएशनकडून अनेकदा तक्रारी करूनही उपाययोजना करण्यात आलेली नाही. कचरा भर दुपारपर्यंत न उचलल्यामुळे व्यापाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. व्यापारी सकाळी व्यवसायासाठी नवचेतन्याने दुकानात येतात, मात्र लगेचच त्यांना कचऱ्याचे दर्शन घडते. सर्वत्र पसरलेल्या दुर्गंधीमुळे दुकाने उघडता येत नाहीत, ज्यामुळे त्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागते. येणाऱ्या ग्राहकांनाही या दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागतो. व्यापारी मोठ्या प्रमाणात कर भरतात तसेच महानगर पालिका चे देखील सर्व कर नियमित भरतात, तरीही त्यांना वारंवार हा त्रास सहन करावा लागत आहे. आजही अशीच परिस्थिती निर्माण झाल्याने व्यापाऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिला. नगरसेवक बाळासाहेब बोराटे आणि अभिषेक कळमकर यांनी तातडीने हस्तक्षेप करून कचरा उचलण्याची व्यवस्था केली. दुपारी १:३० वाजता कचरा उचलला गेला, पण व्यापाऱ्यांमध्ये असंतोष कायम आहे.

व्यापारी किशोर बल्लाळ, रवी गांधी, संजय काठेड, ललित कटारिया, अमित गांधी, धर्मेंद्र सोनग्रा यांनी आपली व्यथा व्यक्त केली. अहिल्यानगर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष ईश्वर बोरा यांनी इशारा दिला की, जर पुन्हा अशी परिस्थिती निर्माण झाली तर व्यापारी मोठे आंदोलन उभारतील आणि कचरा महानगरपालिका आयुक्तांच्या दालनात आपापल्या कर्मचाऱ्यांच्या सहायाने कचरा जमा करून त्यांना स्वाधीन करतील. या वेळी उपस्थित नगरसेवकांनीही व्यापाऱ्यांना पूर्ण पाठिंबा देण्याची ग्वाही दिली. सैनिटरी ऑफिसर आणि ठेकेदाराकडून पुन्हा असे होणार नाही याबाबत लेखी आश्वासन घेतले गेले आहे.

# डम्परच्या धडकेत पोलीसाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज


**ठाणे :** वर्तकनगर येथील कोरस भागात ठाणे क्राईम ब्रांचचे पोलीस कॉन्स्टेबल सुनील रावते (४४) यांच्या अंगावरून डम्पर गेल्याने त्यांचा मृत्यू झाला. तर, त्यांच्या सोबत दुचाकी चालविणाऱ्या महिलेचाही मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद वर्तकनगर पोलीस ठाण्यात करण्यात येत आहे. वर्तकनगर भागात सुनील रावते हे कार्यरत आहेत. ते ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेच्या वागळे युनीटमध्ये कार्यरत होते. बुधवारी सकाळी ते एका महिलेच्या दुचाकीवरून खासगी कामासाठी जात होते. त्याचवेळी डम्परच्या चाकाखाली आल्याने रावते आणि त्यांच्यासोबत असलेल्या महिलेचा मृत्यू झाला. अपघात नेमका कसा झाला आहे हे अद्याप कळू शकले नाही. अपघाताची नोंद वर्तकनगर पोलीस ठाण्यात करण्यात येत आहे. दोघांचेही मृतदेह जिल्हा शासकीय रुग्णालयात ठेवण्यात आले आहे. सुनील रावते यांच्या पश्चात त्यांची पत्नी आणि मुले आहेत. त्यांच्या मृत्यूने हळहळ व्यक्त केली जात आहे.



# जगातील युवकांचा आयकॉन - अर्नेस्ट्रोचे 'चे' गव्हेरा


आधुनिक केसरी

***अर्नेस्टो 'चे' गव्हेरा यांचं 'द मोटरसायकल डायरीज' हे अमृता देशपांडे यांनी मराठी भाषेत अनुवाद केलेलं पुस्तक नुकतेच माझ्या वाचनात आलं. मला वाटतं या पुस्तका विषयी समजून घेण्याअगोदर आपण अर्नेस्टो 'चे' गव्हेरा कोण होते हे समजून घेतलं पाहिजे. कारण ते 'चे गव्हेरा' या नावाने जगात सर्वत्र ओळखले जातात. आपणही प्रतिमा रूपाने त्यांना एखाद्या टी-शर्टवर, एखाद्याच्या कॅपवर, एखाद्याच्या कमरपट्ट्यावर 'चे' यांची प्रतिमा आणि त्यांचं आकर्षक रूप अनेकदा बघितले आहे. परंतु नेमकेपणाने अर्नेस्टो 'चे' गव्हेरा कोण होते, त्यांचा जीवन विषयक विचार काय आहे, त्यांनी काय काम केले आहे. याविषयी सर्वसामान्यास काही एक कल्पना नसते. खरंतर अर्नेस्टो 'चे' गव्हेरा हे अर्जेंटिनाचे. अर्जेंटिना देशात मित्राला हाक मारण्यासाठी 'चे' हा शब्दप्रयोग केला जातो. चळवळीत काम करीत असताना, सहकाऱ्यांना हाक देताना गव्हेरा वारंवार 'चे' हा शब्दप्रयोग करीत असल्यामुळे त्यांच्या मित्राकडून त्यांना 'चे' हे टोपण नाव देण्यात आले. आज 'चे' गव्हेरा यांचा जन्मदिवस असून यानिमित्ताने त्यांच्या 'द मोटरसायकल डायरीज' या पुस्तकाची आपण चर्चा करूया.***



**कु. मयुरी तेगमपुरे,**
इयत्ता १० वी, मत्स्योदरी विद्यालय, अंबड, जि. जालना.
मो. ९४२३९९३१३७

'चे' गव्हेरा यांचा जन्म १४ जून १९२८ रोजी अर्जेंटिनामध्ये एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. 'चे' लहानपणापासूनच तत्त्वज्ञान, गणित, अभियांत्रिकी, राजकारण, समाजकारण आणि इतिहास या सगळ्याच विषयात त्यांना चांगलाच रस होता. शालेय शिक्षणानंतर त्यांनी वैद्यकीय शिक्षण घेतलं. हे वैद्यकीय शिक्षण सुरू असतानाच चे व त्यांचे मित्र अल्बर्ट ग्रॅनाडो यांच्यासोबत मोटरसायकलवर जवळपास दहा हजार किलोमीटर पेक्षा जास्त प्रवास करून चिले, पेरू, कोलंबिया, व्हेनेझुएला आणि युनायटेड स्टेट्स असे पाच देश अक्षरशः पालथे घातले. चे' गव्हेरा यांच्या दोन वर्षाच्या या सफरीमध्ये त्यांनी या गरीब देशातल्या माणसांच्या समस्या आणि त्यांचे प्रश्न खूप जवळून अनुभवले. गव्हेरांनी त्या देशातल्या माणसांचं गरीबी, उपासमार, शोषण, स्वातंत्र्याचा अभाव आणि गुलामगिरी पाहून त्यांच्यासाठी काहीतरी करण्याची गरज आहे हे जाणले आणि त्यानंतर त्यांनी क्युबन क्रांतीचे नेते व दीर्घकाळ क्यूबाचे राष्ट्राध्यक्ष म्हणून ज्यांनी आपला प्रभाव सोडला. अशा फिडेल कॅस्ट्रो सोबत क्यूबाच्या स्वातंत्र्यलढ्यात स्वतःला झोकून दिलं. त्यांनी गुरिला चळवळ सुरू केली. क्युबा या देशास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर फिडेल कॅस्ट्रो त्या राष्ट्राचे पंतप्रधान झाले आणि त्यांनी गव्हेरा यांना गृहमंत्री पद दिले. पण गृहमंत्री पदावर काम करत असतानाच इतर देशांनाही आपली गरज आहे ही जाणीव त्यांना अस्वस्थ करत होती. एके दिवशी अचानक हे पद सोडून पुन्हा इतर गरीब देशांना स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी काही जुजबी अत्यावश्यक सामानाशी ते बाहेर पडले. त्यांनी संपूर्ण जगातील 'नाही रे' वर्गासाठी लढण्याचा पुरस्कार केला. लढत असतानाच ८ ऑक्टोबर १९६७ रोजी ते बोलीव्हियामध्ये पकडल्या गेले आणि दुसऱ्याच दिवशी त्यांना गोळ्या घालून ठार करण्यात आले. मरण्यापूर्वी त्यांचे शब्द होते. "DO NOT SHOOT. I AM 'CHE' GUEVARA AND WORK MORE TO YOUR ALIVE THAN DEAD." म्हणजे, मला गोळ्या घालू नका मी चे गव्हेरा आहे. आणि मला मारण्यापेक्षा मी जिवंत असणंच तुमच्यासाठी अधिक मोलाच आहे. हे अगदी निक्षूनपणे सांगण्यासही ते कचरले नाहीत.




अर्नेस्टो चे गव्हेरा हे मार्क्सवादी क्रांतीकारक, चिकित्सक लेखक, गनिमी नेता, मुत्सुद्दी राजकारणी आणि लष्करी सिद्धांतकार होते. ते क्युबन क्रांतीचे एक प्रमुख नेते होते. या नाम विशेषणासह गव्हेरा यांची प्रतिमा लोकांमध्ये रुजली आहे. याच गव्हेरांनी द मोटरसायकल डायरीज हे पुस्तक लिहिलं आहे. मला वाटतं हे पुस्तक सर्वांनी वाचलं पाहिजे. ते का वाचलं पाहिजे याविषयी थोडसं.

मधुश्री पब्लिकेशनने प्रकाशित केलेल्या या पुस्तकाचा अतिशय रसाळ आणि वाचकाची उत्सुकता वाढवणारा अनुवाद अमृता देशपांडे यांनी केलेला आहे. द मोटरसायकल डायरीज हे प्रसंग वर्णनात्मक पुस्तक आहे. अर्नेस्टो चे गव्हेरा यांनी त्यांचे मित्र अल्बर्टो ग्रॅनाडो यांच्यासोबत 'ला पोडेरोसा' (मोटरसायकलचे नाव) वर केलेल्या प्रवासाचे त्यांनी त्यांच्या डायरीत केलेले टिपण म्हणजेच द मोटरसायकल डायरीज हे पुस्तक होय.

चिले, पेरू, कोलंबिया, व्हेनेझुएला आणि युनायटेड स्टेट्स या पाच देशात त्यांनी सलग दोन वर्ष प्रवास केला हा प्रवास करीत असतानाच त्या दोन जीवांना अनेक संकटांना सामोरे जावे लागले चे गव्हेरा यांना दम्याचा (अस्थमा) त्रास होता. त्यामुळे त्यांना याचा अनेक वेळेस त्रास झाला. पण स्थानिक डॉक्टरांनी त्यांचे उपचार अनेक वेळा अगदी मोफत केले. हे दोघेही मित्र मनानं आधीच संवेदनशील होते. त्यातच त्यांनी या प्रवासात गरीब देशातल्या समस्या, त्यांचे प्रश्न, उपासमार, हालअपेष्टा, त्या ठिकाणची जातीव्यवस्था, रूढी परंपरा आणि तिथल्या लोकांचं जगणं जवळून पाहिलं या सगळ्याचा त्यांच्या अंतर्मनावर गंभीर प्रभाव पडला.

चे गव्हेरा यांचे हे वर्णन वाचताना आनंद आणि दुःख दोन्हीही एकाच वेळेस अनुभूतीस येते. हा प्रवास आपण स्वतः करतो आहोत अशी भावना वाचकांची निर्माण होते. अँडीज पर्वतरांगा मधून प्रवास करताना जणू आपणच त्या नागमोडी वळणावर आहोत की काय असे आपल्याला वाटायला लागते. हा प्रवास करीत असताना त्यांची ला पोडेरोसा या मोटार सायकलने त्यांची खूप साथ दिली. तिला अनेक वेळा तारिने बांधावं लागत असे, पण शेवटी 'ला पोडेरोसानेही' तिचे प्राण सोडले. त्यानंतर त्यांना ट्रक, बसची मदत घ्यावी लागली. त्यांना आपण आज कुठे मुक्काम करणार, काय खाणार हेही माहित नसत. परंतु यापूर्वी उल्लेख केलेल्या देशातील लोकांनी त्यांचा पाहुणचार अगदी प्रेमाने केले.

या प्रवासात चे गव्हेरा यांनी अनेक गोष्टीचे अगदी बारीक निरीक्षण केल्याचे पुस्तकातून पाहावयास मिळते. विविध बाबींचे केवळ निरीक्षण केले नाही तर त्याविषयी खोलात जाऊन समजून घेतलं. उदा. चुकिकामाटाची खाण, इकीकेतील प्रॉस्पेडिया नायट्रेट कंपनी इत्यादी.. याबद्दल त्यांनी अनेक माहिती या पुस्तकात सांगितले आहे. जिज्ञासूंनी ते पुस्तक मुळातूनच वाचणं मला वाटतं गरजेचं आहे. खऱ्या अर्थाने मला हे पुस्तक फार भावलं आहे. मला वाटतं चे गव्हेरा यांचे हे प्रवास वर्णन तरुणांनी वाचले पाहिजे. कारण 'चे' वाचल्याशिवाय 'चे' जगल्याशिवाय कळत नाही.

**पुस्तक - द मोटरसायकल डायरीज**
**लेखक - अर्नेस्टो चे गव्हेरा. मराठी अनुवाद - अमृता देशपांडे**
**पृष्ठ संख्या - २५६.**
**प्रकाशन - मधुश्री पालिकेशन. पुणे.**

# स्वयंस्फूर्त रक्तदाता हाच जीवनदाता


आधुनिक केसरी

***१४ जून हा आधुनिक रक्त संक्रमण प्रक्रियेचे जनक असलेल्या ऑस्ट्रेलियातील डॉ.कार्ल लँडस्टेनर या जीवशास्त्रसंशोधकाचा जन्मदिवस असून त्यांनी मानवी रक्तगटांचा शोध लावल्याने त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस संपूर्ण जगात जागतिक रक्तदान दिवस म्हणून साजरा केला जातो. पहिला जागतिक रक्तदान दिवस २००४ मध्ये मर्यादित स्वरुपात साजरा करण्यात आला.तर २००५ साली झालेल्या ५८ व्या जागतिक आरोग्य संमेलनात जागतिक आरोग्य संघटनेच्या सर्व सदस्य राष्ट्रांनी १४ जून हा दिवस जागतिक रक्तदान दिवस म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. तेव्हापासून जगभरात दरवर्षी १४ जून हा दिवस 'जागतिक रक्तदान दिन' म्हणून साजरा केला जातो.***



**दिलीप कोठावदे**
(विश्वविक्रमी रक्तदाता पत्रकार)

कार्ल लँडस्टेनर यांनी रक्तगट प्रणालीची ओळख जगाला करून दिली. त्यांना रक्तगटांच्या शोधासाठी १९३० मध्ये नोबेल पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले. लँडस्टेनर हे मानवी रक्ताचे ए, बी, एबी आणि ओ या गटांमध्ये वर्गीकरण करणारे पहिले शास्त्रज्ञ होते. त्यांच्या या शोधामुळे समान रक्तगटाच्या लोकांमध्ये रक्त संक्रमण करण्याची ऐतिहासिक प्रक्रिया सुरू झाली. जागतिक आरोग्य संघटनेकडून दरवर्षी एक सूत्र किंवा घोषवाक्य घेऊन हा दिवस साजरा केला जातो. यंदा जागतिक रक्तदान दिनाचा २० वा वर्धापन दिन असून "जगातील सर्व रक्तदात्यांचे आभार व त्यांच्या प्रति कृतज्ञता " अशा आशयाचे सुत्र जागतिक आरोग्य संघटनेने घोषित केले आहे. संपूर्ण जगात जागतिक आरोग्य संघटना (WHO) स्वयंस्फूर्त रक्तदानाचा



टक्का वाढवा यासाठी प्रयत्नशील आहे. आपल्या देशात देखील विविध शासकीय, सामाजिक, सेवाभावी संस्था तसेच रक्तदान प्रबोधनासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींकडून या दिवसाचे आयोजन केले जाते. भारतीय लोकांमध्ये रक्तदाना संदर्भात जनजागृती व्हावी तसेच रक्तदात्यांना प्रोत्साहन मिळून त्यांचा उत्साह वाढावा आणि नवीन रक्तदात्यांना प्रेरणा मिळावी या हेतूने रक्तदात्यांचा सन्मान केला जातो. तसेच ठिकठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजनही केले जाते.सुरक्षित रक्त ही अलीकडच्या काळातील वैश्विक समस्या झाली आहे. दरवर्षी ९ कोटी युनिटपेक्षा अधिक रक्तदान केले जाते. तरीही रक्ताचा तुटवडा जाणवतो. अपघातग्रस्त व्यक्ती, शस्त्रक्रिया झालेले व्यक्ती, रक्तातील त्रुटी असलेले व्याधीग्रस्त व्यक्ती, बाळंतपणात होणारे मातांचे मृत्यू आणि कुपोषण, विविध प्रकारचे बाळ मृत्यू, साथीचे आजार यांचे प्रमाण वाढते असल्याने रक्ताच्या मागणीत सातत्याने वाढच होत असून दर दोन सेकंदाला एका रक्त युनिट ची गरज भासत असते. मात्र आपल्याकडे मागणीच्या तुलनेत होणाऱ्या पुरवठ्याची संख्या अतिशय तोकडी आहे. १४४ कोटींच्या वर लोकसंख्या असलेल्या आपल्या देशात दर हजारी फक्त ८ लोक स्वेच्छा रक्तदान करतात. त्यामुळे देशात रक्ताची कमतरता ही मोठी समस्या निर्माण झालेली आहे. अत्यवस्थ रुग्ण,गर्भवती महिला,अपघातातील रुग्ण, तातडीच्या शस्त्रक्रिया, थॅलॅसेमिया, हिमोफिलिया,सिकलसेल आजारग्रस्त रुग्णांना अशा वेळी जर आवश्यक रक्ताचा पुरवठा होऊ शकला नाही तर त्यांचे जीवन धोक्यात येते.त्यामुळे प्रत्येक सक्षम व्यक्तीने सजगपणे व आपले कर्तव्य समजून रक्तदान करणे गरजेचे आहे. साधारणपणे आपल्या शरीरात सहा ते सात लिटर रक्त असते. रक्तदानावेळी त्यातून फक्त ३५० एम.एल. रक्त घेतले जाते. त्यामुळे आपल्या शरीरातील रक्ताभिसरणावर कोणताही परिणाम होत नाही किंवा आपले वजनही कमी होत नाही. तसेच आपल्याला कुठलाही त्रास होत नाही.

आपण दिलेले रक्त अवघ्या ३६ ते ४८ तासांत नव्याने तयार होते. त्यामुळे आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढून आपल्याला अतिशय ताजेतवाने स्फुर्तीमय वाटते. आतातर अत्याधुनिक वैज्ञानिक प्रगतीमुळे आपल्या एका रक्तदानातील रक्ताचे घटक वेगवेगळे करून त्याच्या उपयोगातून तीन ते चार रुग्णांचा जीव वाचविला जाऊ शकतो. म्हणजे आपले एक रक्तदान हे चार लोकांसाठी जीवनदान ठरू शकते. यापेक्षा मोठे पुण्य आणि आत्मिक समाधान कोणते असु शकते ? **ब्लडग्रुप** : आपल्या रक्ताचे सर्वसाधारणपणे चार गट पडतात, यात ए, बी, एबी, आणि ओ असे चार गट असून यात चार पॉझिटिव्ह आणि चार निगेटिव्ह असे प्रकार आहेत. तर नवीन संशोधनात आढळलेला बॉम्बे ब्लड ग्रुप हा ठराविक दात्यांमध्येच आढळतो. त्यांची संख्या खूप मर्यादित आहे. सध्या नॅकस्टेडेड ब्लड सर्वाधिक सुरक्षित असून याचा वापर वाढल्यास पुढील होणारे मोठे संभाव्य धोके कमी होऊ शकतात. रक्त साठवण कालावधी मर्यादित असल्याने गरजेच्यावेळी सर्व रक्तगटांचा पुरेसा व सुरक्षित पुरवठा होण्यासाठी तुम्ही-आम्ही केलेले रक्तदान हाच मुख्य स्रोत असतो. **रक्तदान कोण करू**



**शकतो ?** १८ ते ६५ वयातील कोणतीही निरोगी व सक्षम व्यक्ती रक्तदान करू शकते. रक्तदात्या व्यक्तीचे वजन किमान ४५ किलो व रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण १२.५ ग्रॅम असणे आवश्यक असते.

निरोगी पुरुष दर तीन महिन्यांत तर स्त्री दर चार महिन्यात रक्तदान करू शकते. **रक्तदानाचे फायदे काय?** गरजू लोकांना रक्त उपलब्ध करून देणं हा रक्तदानाचा एकमेव उद्देश नाही, तर याचे इतरही अनेक फायदे आहेत. रक्तदानामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो. रक्तदान केल्याने शरिरातील विशेषतः पुरुषांच्या शरिरातील लोहाची पातळी विशिष्ट मर्यादेपर्यंत राहते आणि यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो. रक्तदान केल्याने आपल्या शरीरात नवीन रक्तपेशी तयार होतात. त्यामुळे आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते.

आजच्या युगात रक्तदान हेच सर्वार्थाने श्रेष्ठदान आहे. ज्याच्यामुळे लाखो लोकांना जीवनदान मिळते, त्यामुळे रक्तदान हे जीवनदान आहे ही बाब प्रत्येकाने आपल्या मनात ठासून ठेवली आणि प्रत्यक्षात कृतीत आणली तर पुढच्या काही वर्षात रक्ताच्या अनुपलब्धतेची समस्या ही समस्या नावालाही रहाणार नाही. त्यासाठी प्रत्येकाने अपल्यापासूनच सुरुवात करायला हवी.

# सर्वांनी नेत्रदानाचा संकल्प करावा : डॉ. मंगेश गुलवाडे

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात नेत्रदानपर संवादाचा कार्यक्रम संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जागतिक नेत्रदान दिवसाच्या निमित्ताने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे आय डोनेशन मल्टी पर्पज सोसायटीच्या संयुक्त विद्यमानाने नेत्रदानाचा संकल्प करणाऱ्या व्यक्तींचा सत्काराचा कार्यक्रम घेण्यात आला.

त्यानिमित्ताने सुधीर भाऊ मुनगंटीवार पालकमंत्री चंद्रपूर जिल्हा यांचे प्रतिनिधी म्हणून भाजपा जिल्हा महामंत्री डॉ. मंगेश गुलवाडे उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने चंद्रपूर महानगरातील नेत्रदानाचा संकल्प करणाऱ्या सुनिता वैद्य,कृष्णा गाईन, शंभू विश्वकर्मा, एड.जनार्दन सुकळी, डॉ.अनुप हस्तक, डॉ.राधिका हस्तक, डॉ. एम.डी. पाल,डॉ. अविनाश दाते, योगेंद्र इंदुरकर, रुपेश डोरले, महिंद्र बाणिक, पी.साबळे, मंदीप बीरेवाल, प्रतीक्षा बिरेवार व कल्पना रावल यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यांप्रसंगी बोलताना डॉ.मंगेश गुलवाडे म्हणाले की, "मरावे परी दृष्टी रुपी उरावे " या उक्तीप्रमाणे मरनोप्रांत देखील आपण जिवंत राहू शकतो व सर्व सृष्टी पाहू शकतो आणि अवयव दानात श्रेष्ठदान असणाऱ्या नेत्रदानाचा सर्वांगीण संकल्प करावा असे आवाहन केले. यांप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना चंद्रपूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांनी या नेत्रदानावर आयोजित केलेल्या जनजागृती पर कार्यक्रमाची गरज असल्याचे प्रतिपादन केले आणि उपस्थित असणाऱ्या नागरिकांनी नेत्रदानाचे आरोग्य दूत म्हणून समाजामध्ये नेत्रदानाचा प्रचार व प्रसार करावा असे सूचक वक्तव्य केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रभारी अधिष्ठाता डॉ.राजेश सुरपाम यांनी आय डोनेशन मल्टीपर्पज सोसायटी या संस्थेची प्रशंक्षा केली, तसेच उपस्थित असणाऱ्या तृतीय वर्षीय एम.बी.बी.एस.च्या विद्यार्थ्यांना नेत्रदान संबंधी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन डॉ. सपन दास (अध्यक्ष आय डोनेशन मल्टीपर्पज सोसायटी) यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. प्रीती उराडे तर डॉ. सपण दास यांनी आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पारितोषिक मिस्त्री, मि. पंकज, योगेंद्र दांडेकर यांनी अथक परिश्रम घेतले.



# तब्बल ४५ वर्षांनी भरला माजी विद्यार्थ्यांचा वर्ग; गुरुजनांचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. सुभाष शेटे**

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्यातील कवठे येमाई येथील रयत शिक्षण संस्थेच्या न्यु इंग्लिश स्कुल व ज्युनियर कॉलेज ऑफ आर्ट महाविद्यालयाच्या प्रांगणात सन १९७८-७९ मध्ये दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकडून एकत्र येऊन स्नेह मेळावा व गुरुजन सन्मान सोहळ्याचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील व लक्ष्मीबाई यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आले. या मेळाव्यासाठी सन १९७८-७९ च्या विद्यार्थ्यांना अध्यापन करणारे शिक्षक कवितके सी. के. वाळुंज एस.जे, आवळकर एस. के. कांदळकर अे. डी. यांचा सन्मान शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. त्यावेळची शाळेतील मस्ती, गमतीजमती, अभ्यास, शिक्षकांचा मिळालेला मार, शिक्षा, शाळेतील क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविध विषयांवर माजी विद्यार्थ्यांनी गप्पा करून जुन्या आठवणींना उजाळा दिला. या शाळेत शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज नोकरी, राजकारण, उद्योग, शिक्षण, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रात काम करीत आहेत तर काही निवृत्त झाले असून त्यांनी आपल्या क्षेत्रात कामाचा वेगळा ठसा उमटविला आहे. या गप्पांच्या ओघात सर्वजण आपण इतके मोठे झाले आहोत हे विसरून गेले होते. त्यावेळी असणारे विद्यार्थी आता आपआपल्या क्षेत्रातून निवृत्त झाले आहेत. हे दिवस कसे सरले हे कळलेच नाही असे अनेकांनी मनोगत व्यक्त केले. त्या वेळच्या आठवणी आयुष्यात पुन्हा कधीही येणार नाहीत असेच सर्वांना वाटत होती व पुन्हा एकदा एकत्र आल्यानंतर त्या आठवणी पुन्हा ताज्या झाल्या. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून विद्यालयाचे माजी विद्यार्थी सेवानिवृत्त डी. वाय. एस. पी. बाबाजी तथा महादेव गावडे उपस्थित होते. त्यांचाही सन्मान या बॅचच्या विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आला. या स्नेह मिळवण्यासाठी ३२ विद्यार्थी सपत्नीक उपस्थित होते. या स्नेह मेळाव्यात अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करुन त्यावेळच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच त्या वेळच्या शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त करुन आपल्या मनोगतामध्ये त्यांनी या बॅचचा खूप अभिमान असल्याचे मत व्यक्त करून आपल्या शिष्यांचे कर्तुत्व पाहून जीवन सार्थक झाले असे म्हटले .प्रमुख पाहुणे बाबाजी गावडे यांनी शालेय जीवनातील त्या वेळच्या आठवणी आपल्या मनोगतातून व्यक्त केल्या. ग्रामस्थांच्या वतीने रामदास सांडभोर यांनी मनोगत व्यक्त केले. स्नेह मेळाव्याचे नियोजन प्रकाश ईचके, दहशतवाद विरोधी पथकात कार्यरत असताना सेवानिवृत्त झालेले पोलीस निरीक्षक लक्ष्मण कुंभार, ज्ञानसुख फटांगडे, गंगाधर गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संपत कांदळकर, प्रास्ताविक व स्वागत प्रकाश इचके, आभार सेवानिवृत्त प्राचार्य संजय चौधरी यांनी मानले. यावेळी माजी विद्यार्थी लक्ष्मण कुंभार, ज्ञानसुख फटांगडे, अनिल रोडे, अर्जुन वागदरे, प्रकाशे ईचके, बाबाजी फटांगडे, सुनील रत्नपारखी, विमल थिटे, गंगाराम गायकवाड, रोहिदास वागदरे, जयवंत भोर, निवृत्ती कोळेकर, बबन वागदरे, कुशाबा ईचके, शांताराम इचके, मंदा चोरे, मीरा शिंदे, रत्नप्रभा पवार, मधुकर केदारी, राजेंद्र कोठारी, सुभाष रेणके, सिताराम येडे,जयश्री अडुळकर, मिट्ठु बाफना आदी उपस्थित होते. यावेळी विद्यालयासाठी सर्वोतोपरी मदत करण्याचा मनोदय सर्वांनी व्यक्त केला.

# प्री पेड स्मार्ट मिटरविरोधात समर्थन देण्याचे भाकपचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** अगोदरच प्रचंड महागाई वाढवुन सर्वसामान्यांना मरणाच्या दारात आणुन उभा करणार्या केद्र व राज्य सरकारने प्री पेड स्मार्ट मीटर द्वारे दरोडा टाकण्याची योजना आणली आहे असा आरोप करुन भाकपने जनआंदोलनाला समर्थन देण्याचे आवाहन नागरीकांना केले आहे. याबाबत असे की, गॅस, डीझेल, पेट्रोल, तेल, डाळी, दुध इत्यादी महाग करुन सर्वसामान्यांची लुट करणाऱ्या मोदी- शिंदे- फडणवीस - अजित पवार सरकारने आता कधीही, कितीही वीज दर वाढवण्यासाठी अदाणी व इतरांना कंत्राट देऊन प्री पेड स्मार्ट मीटर लावुन सर्वसामान्यांच्या घरावर दरोडा टाकण्यासाठी महावितरण कंपनीने राज्यातील सर्व वीज ग्राहकांना स्मार्ट प्रीपेड मीटर्स लावणार असे जाहीर केले आहे. या संबंधातील टेंडर्स मंजूर करण्यात आलेली आहेत व लवकरच सर्वत्र मीटर्स लावण्याची मोहीम सुरू होईल, असे स्पष्ट दिसून येत आहे. वास्तविक हे मीटर्स मोफत लावले जाणार नाहीत. वीजदरवाढीच्या रुपाने १ एप्रिल २०२५ पासून ग्राहकांच्या खिशातूनच 12000/- रुपये वीज बीलात लावुन हप्त्याने वसूल केले जाईल, हे निश्चित व स्पष्ट आहे.



त्यामुळे केवळ खाजगी कंपन्यांच्या हितासाठी आणि खाजगीकरणाच्या वाटचालीतील पुढचा टप्पा म्हणनूच ही दरोडा योजना आणलेली आहे असे स्पष्ट दिसून येत आहे. वीज कायदा २००३ मधील अधिनियम क्रमांक ४७(५) अन्वये कोणता मीटर वापरायचा याचे स्वातंत्र्य व मीटरची निवड करण्याचे सर्व कायदेशीर हक्क संबंधित ग्राहकांना आहेत. अघोषित सक्ती करून ग्राहकांच्या या हक्काचे व कायदेशीर तरतुदींचे संपूर्ण उल्लंघन अदानी आणि इतरांना चरण्यासाठी मोकळ रान करत आहेत. ज्याप्रमाणे मोबाईल प्री पेडचे दर कंपनी मालक व टोल कंपनी फास्ट टॅग सक्तीचे करुन परस्पर वाढवते त्याच प्रमाणे आणि ग्राहक काहीच करु शकत अशीच लुट वीज बीला मार्फत केली जाईल अशी शक्यता निर्माण झाली आहे. याविरोधात ग्राहक तक्रार निवारण मंचात देखील जाता येणार नाही, औरंगाबाद साठी हैद्राबादच्या कंपनीला कंत्राट दिल्याने हैद्राबादला जाऊन केस करावी लागेल अशी ही माहीती मिळत आहे. सरकार अशा प्रकारचे षडयंत्र करीत असतांना भारतीय कम्युनिस्ट पक्ष जनतेच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी रस्त्यावर उतरला आहे.

ग्राहक हक्कानुसार सध्याचा आहे तोच पोस्टपेड मीटर पुढेही कायम ठेवण्यात यावा अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्ष करीत आहे. पहील्या टप्प्यात जनसमर्थन मोहीम करुन प्रीपेड स्मार्ट मीटर्सना विरोध केला जाणार आहे. 9823980665 या मोबाईलवर संदेश पाठवुन या जनआंदोलनाला समर्थन देण्याचे आवाहन भाकपचे शहर सचिव ॲड. कॉ. अभय टाकसाळ, सहसचिव कॉ. जॅक्सन फर्णांडीस, कॉ. अनिता हिवराळे, कॉ. रफीक बक्श, कॉ. माया भिवसने, कॉ. प्रकाश बनसोड, कॉ. जफर फजलु रहमान, कॉ विकास गायकवाड, कॉ. मनिषा भोळे, कॉ. नीता कीर्तीशाही, कॉ सुरेश ठोंबरे, कॉ सुभाष साबळे यांच्यासह अनेकांनी केले आहे.

# शिरूर आगाराची बंद असलेली पुणे -पारगाव -साकोरी एसटी पुन्हा सुरु करा

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. सुभाष शेटे**

**कवठे येमाई :** मागील दोन वर्षांपासून पासून शिरूर आगाराकडून बंद करण्यात आलेली पुणे -पारगाव -साकोरी मुक्कामी ही एसटी बस पुन्हा पुर्ववत सुरू करा अशी मागणी शिरूर तालुक्यातील बेट भागातील नागरिक व प्रवासी वर्गातून होत आहे. बेट भागातील नागरिकांना शिक्रापूर, रांजणगाव एमआयडीसी, पुणे या ठिकाणी येणे जाण्यासाठी थेट एस. टी. बस सेवा उपलब्ध नाही.त्यामुळे प्रवाशांना खाजगी वाहनांनी प्रवास करावा लागत आहे.तसेच या भागातील शालेय मुले, महाविद्यालयीन विद्यार्थी,तरूण, नोकरदार यांची गैरसोय होत आहे. शिवाजीनगर पुणे बस स्थानकातून सायंकाळी चार ला सुटणारी पुणे -पारगाव -साकोरी मुक्कामी एस. टी. बस सेवा सुरु करण्यासाठी अनेक दिवसांपासून आगार व्यवस्थापक यांचेकडे पिंपरखेड ग्रामपंचायत पत्रव्यवहारद्वारे मागणी करत आहे. परंतु आगार व्यवस्थापक यांनी एस. टी. बस सेवेची कमतरता असल्याच्या कारणामुळे मागणी असतानाही सदर एस. टी. बस सेवा अद्याप ही सुरु केलेली नाही. शिरूर आगाराची पुणे शिक्रापूर- वरुडे- वाघाळे - मलठण- टाकळी हाजी - जांबूत - पिंपरखेड पारगाव साकोरी मुक्कामी एस. टी. बस यापूर्वी सुरु होती. शिरूर आगाराकडून ही एस टी बस बंद करण्यात आल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे. त्यामुळे पुणे पारगाव साकोरी मुक्कामी ही सोयीची ठरणारी बस सुरू करण्याची मागणी जांबूत, पिंपरखेड,आमदाबाद या ग्रामपंचायतींनी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.



या संदर्भातील पत्र विभागीय कार्यालयाला प्राप्त झाले असून प्रवाशांच्या मागणीनुसार पुणे पारगाव साकोरी ही बस १९ जूनपर्यंत सुरू करण्यात येईल . या भागातील शालेय विद्यार्थ्यांनी पास काढून घ्यावे तसेच या मार्गावरील गावातील प्रवाशांनी या बसने प्रवास करावा .
**मनिषा गायकवाड , शिरूर एस टी आगार प्रमुख**

# शेतात औषध उडाल्याने बापलेकांना मारहाण

## शिरूरच्या बुरुंजवाडी येथील घटना

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. सुभाष शेटे**

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्यातील बुरुंजवाडी येथे शेतात मेथीच्या भाजीवर औषध फवारत असताना शेजारील पडीक शेतात औषध उडाल्याने बापलेकांना बेदम मारहाण करुन शेतकऱ्याचा दात पाडून शेतकऱ्याला नातवाप्रमाणे खल्लास करण्याची धमकी देण्यात आल्याची घटना घडली आहे. याबाबत शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे गणेश पोपट धुमाळ, बेबी पोपट धुमाळ व संगीता गणेश धुमाळ यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बुरुंजवाडी येथे तानाजी धुमाळ यांची शेती असून तानाजी हे शेतात शेळ्या चारत असताना त्यांचा मुलगा किसन हा शेतातील मेथीच्या पिकावर औषध फवारणी करत होता. त्यावेळी शेजारील शेती असलेले गणेश धुमाळ व दोन महिला शेतात दांडके घेऊन आल्या त्यांनी किसन यास आमच्या शेतात औषध उडत आहे असे म्हटल्याने तानाजी व किसन हे दोघे तुमचे शेत पडीक आहे असे म्हणत असताना तिघांनी किसन याला मारहाण करण्यात सुरुवात केली. दरम्यान तानाजी हे मुलाला सोडवण्यासाठी मध्ये गेले असता मारहाण करणाऱ्या




तिघांनी त्यांना देखील बेदम मारहाण करत जखमी केले. यावेळी तानाजी यांचा दात देखील पडला.मारहाण करणाऱ्या लोकांनी तुमचा नातू जसा मेला तसे तुम्हाला मारू अशी धमकी दिली.याबाबत तानाजी नानासाहेब धुमाळ वय ६३ रा.पद्मावती वस्ती गणेगाव खालसा ता. शिरुर जि.पुणे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली असल्याने पोलिसांनी गणेश पोपट धुमाळ, बेबी पोपट धुमाळ व संगीता गणेश धुमाळ तिघे रा.बुरुंजवाडी ता.शिरुर जि.पुणे यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार मंगेश लांडगे हे करत आहेत.

# नगर जिल्ह्यात महावितरणकडून लवकरच प्रीपेड स्मार्ट मीटर; महावितरणचे सहा लाख ग्राहक

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** महावितरणचे सध्या असलेली मीटर लवकरच कालबाह्य होणार असून जुन्या मीटरची जागा प्रीपेड स्मार्ट मीटर घेणार आहे. महाराष्ट्रात दोन कोटी किती लाख ग्राहक असून नगर जिल्ह्यात सहा लाख ३६ हजार १९२ ग्राहकांचे मीटर बदलण्यात येणार आहे लवकरच याबाबत प्रक्रिया गतिमान केली जाणार आहे.

नगर जिल्ह्यात स्मार्ट मीटर बसवण्यासाठी निविदा खर्चाची प्रक्रिया देखील झाली असून नागार्जुन कंट्रक्शन या कंपनीला तसे आदेश देण्यात आले आहे. यासाठी २७ महिन्याचा कालावधी आहे शेती ग्राहक वगळता घरगुती व्यापारी औद्योगिक वीज ग्राहकासह फिटर व रोहित रोहीत्रावर सुद्धा स्मार्ट मीटर बसवले जाणार आहेत त्यासाठी सर्वेक्षण देखील पूर्ण झाले आहे स्मार्ट मीटर बसवल्यानंतर मोबाईल फोन प्रमाणे रिचार्ज करावी लागणार आहे किती वीज वापरली किती बॅलन्स शिल्लक राहिला हे देखील मोबाईलवर समजणार आहे आपल्या आर्थिक क्षमतेनुसार किती वीज वापरायची हे अधिकार देखील आता ग्राहकांना राहणार आहे यापूर्वी प्रतिनिधी रीडिंग घेऊन गेल्यानंतर दिले तसे त्यामुळे कधी कधी ग्राहकाचे आर्थिक बजेट देखील अडचणीत येत होते स्मार्ट मीटर मुळे मात्र आता त्यावर नियंत्रण ठेवता येणार आहे पैसे संपण्याअगोदर ४८ तास अगोदर तसा मेसेज देखील येणार आहे पैसे संपले तरी सायंकाळी सहा ते सकाळी दहा या वेळेत लाईट सुरू राहणार आहे मध्यरात्री अचानक वीज बंद होण्याचा धोका देखील राहणार नाही ग्राहकाने सकाळी दहा नंतर रिचार्ज केल्यानंतर वापरलेल्या विजेचे पैसे कमी होऊन वीजपुरवठा सुरळीत राहील या स्मार्ट मीटरचे नियंत्रण लगेचच्या महावितरणच्या कार्यालयात राहणार आहे.



# येसगाव नं. २ येथे विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची भेट देवून कामांची पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे येसगाव नं२ येथे विविध विभागांच्या अधिकाऱ्यांकडून विकास कामांची पाहणी करून समाधान व्यक्त करण्यात आले तर वृक्षारोपण करण्यात आले. छत्रपती संभाजीनगर - स्वच्छ भारत मिशन अंतर्गत घनकचरा सांडपाणी व्यवस्थापन व जल जीवन मिशन च्या कामाची पाहणी जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक राजेंद्र देसले यांनी आज केली. खुलताबाद तालुक्यातील येसगाव -2 या ग्राम पंचायतींना भेटी देऊन घनकचरा सांडपाणी, जल जीवन मिशनच्या कामाची पाहणी केली पाण्याच्या स्त्रोताची साफसफाई करणे, ओला कचरा सुका कचरा वर्गीकरण बाबत गृहभेटीतून ग्रामस्थांशी संवाद साधला व ग्रामपंचायतींना आवश्यक सूचना दिल्या. ग्रामपंचायत येसगाव -2 येथे गटविकास अधिकारी प्रकाश नाईक, उपअभियंता ग्रामीण पाणीपुरवठा राहुल सैंदाणे, विस्तार अधिकारी पंचायत एच. बी. कहाटे यांच्या समवेत चर्चा करून तालुक्यातील कामाचा आढावा घेत पुढील नियोजन केले व ग्रामस्थांशी संवाद साधला ग्रामपंचायत परिसरात प्रकल्प संचालक यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी उप अभियंता ग्रामीण पाणी पुरवठ्याचे बाळासाहेब शेळके जिल्हा कक्षाचे मूल्यमापन व सनियंत्रण तज्ञ सत्यजित देशमुख माहिती शिक्षण संवाद सल्लागार तथा जनसंपर्क अधिकारी सतीश औरंगाबादकर समाजशास्त्रज्ञ वैशाली जगताप, विस्तार अधिकारी आरोग्य बांगर, शालेय स्वच्छता व आरोग्य तज्ञ प्रतिभा देवतरसे, गट समन्वयक राजेश चव्हाण, मकरंद सुनीता शाखा अभियंता प्रियंका तोनगिरे संबंधित गावाचे सरपंच रेणुका अरुण खंडागळे, श्रीमती एमडी मुळे, ग्रामसेवक मधुकर खंडागळे, ग्रामपंचायत सदस्य अरुण खंडागळे, नागोराव खंडागळे, सुभाष दांगोडे, शिवाजी जाधव, दत्तू खंडागळे, उत्तम पल्लाळ, दत्तू जाधव, शामराव दांगोडे,कानू खंडागळे, विश्वनाथ बोंबले, मनीष खंडागळे, रोजगार सेवक बाळू खंडागळे संजय खंडागळे ग्रामपंचायत कर्मचारी आशा खंडागळे आशा कार्यकर्ती व ग्रामस्थ उपस्थित होते.

# पावसामुळे घराची भिंत कोसळली

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** जोरदार पावसामुळे घराची भिंत कोसळून सुमारे एक लाखांची झाले. सुदैवाने पत्रकार अशोक जोशी यांचे कुटुंब या घटनेत थोडक्यात बचावले.

शहरातील श्री बालाजी मंदिर परिसरात पत्रकार अशोक जोशी व वृत्तपत्र विक्रेते रवींद्र जोशी यांच्या घराची भिंत दिनांक ११ जुन रोजी दुपारी ४ वाजे दरम्यान कोसळली. .शेजाऱ्यांनी आरडा ओरड केल्यामुळे जोशी परिवार बाहेर निघाले आणि थोडक्यात सर्वजण बचावले.शहरात झालेल्या मुसळधार पावसामुळे जोशी यांच्या जुने बांधकाम असलेले घराची साडेतीन फूट रुंदीची भिंत कोसळली. शहर तलाठी श्री तागवाले व पालिका कर्मचाऱ्यांनी घटना स्थळी पंचनामा केला आहे. भिंत कोसळल्याने जोशी यांचे सुमारे एक लाखाचे नुकसान झाले आहे.



# राज्यातील अनेक वीज निर्मिती संच बंद!

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** राज्यातील बऱ्याच भागात मान्सूनचा पाऊस सुरू झाला आहे. त्यामुळे विजेच्या मागणीत मोठी घट होऊन महानिर्मितीसह खासगी कंपनीच्या काही संचातील वीजनिर्मिती थांबवली गेली आहे. तर काही संचातून क्षमतेहून कमी वीजनिर्मिती केली जात आहे. उन्हाळ्यात राज्यातील विजेची मागणी २९ ते ३० हजार मेगावॉटपर्यंत गेली होती. परंतु, राज्यातील बऱ्याच भागात मान्सूनचा पाऊस सुरू झाल्यावर बुधवारी (१२ जून) दुपारी २.३० वाजता ही मागणी सुमारे सात हजार मेगावॉटने घसरून २२ हजार ३७१ मेगावॉटवर आली आहे. त्यामुळे राज्यातील भार प्रेषण केंद्राकडून महानिर्मितीसह खासगी कंपनींच्या महागड्या संचातील वीजनिर्मिती थांबवली गेली आहे. बुधवारी महानिर्मिती आणि खासगी कंपन्यांतील काही केंद्रातील वीज निर्मिती निम्म्याने कमी केली गेली, तर काही केंद्रातील संच कमी क्षमतेने चावले जात आहे. नाशिकमधील महानिर्मितीच्या २५० मेगावॉटच्या चार संचातील वीजनिर्मिती थांबवली गेली. येथे एकाच संचातून २३७ मेगावॉट निर्मिती सुरू आहे. परळीतील २५० मेगावॉटच्या तीन संचातून वीजनिर्मिती थांबवली गेली. कोराडी केंद्रातून १ हजार ४७० मेगावॉटहून कमी वीजनिर्मिती केली जात आहे. मागणी घटल्याने महानिर्मितीला वीजनिर्मिती घटवावी लागल्याच्या वृत्ताला महानिर्मितीच्या जनसंपर्क विभागानेही दुजोरा दिला आहे. अचानक मागणी वाढल्यास ग्राहकांना अखंडित वीजपुरवठ्यासाठी वेळीच वीजनिर्मितीसाठी महानिर्मिती सक्षम असल्याचाही दावा त्यांनी केला.

# वेरूळची महसूल सेवा कोलमडली

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील वेरुळ सह परिसरातील शेतकऱ्यांचे कामे तलाठी सजा मंडळ अधिकारी यांचे सततच्या अधिकारी व लोकप्रतिनिधी यांच्या सेवेत महसूलची कामे खोळंबली असल्याचे चित्र आहे.

वेरूळ सह परिसरातील खेड्यांचा कारभार पाहणाऱ्या वेरूळ मंडळ अंतर्गत असलेल्या मंडळ अधिकारी व तलाठी सजा वेरूळ हे वेरूळ येथे येणाऱ्या अधिकारी व लोकप्रतिनिधींमुळे त्यांना सतत प्रोटोकॉल असल्याने त्यांच्या समवेत लेणी व घृष्णेश्वर मंदिर परिसरात जावे लागत असल्याने वेरूळची महसूल सेवा कोलमडली आहे. यामुळे सामान्य शेतकरी, निराधार महिला, वृध्द व नागरिकांची मोठी दैना होत असून तहसीलदारांनी वेरूळसाठी सेपरेट एक प्रोटोकॉल अधिकारी नेमवावा अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

(याबाबत अधिक माहिती अशी की, सद्य स्थितीत पावसाळा सुरू झाल्याने अनेक शेतकऱ्यांना पीक पेरा,सातबारा, नोंदणी दुरुस्ती, बोजा, फेरफार, विहिरी नोंदणी, पंचनामा, विद्यार्थ्यांना विविध दाखले, निराधार वृद्ध महिला पुरुषांना तलाठी व मंडळ अधिकारी अहवाल याची गरज असते.)

वेरूळ हे जागतिक कीर्तीचे पर्यटन स्थळ आहे. तसेच हिंदू धर्मियांचे पवित्र बारावे ज्योतिर्लिंग श्री. घृष्णेश्वर मंदिर देखील असल्याने या ठिकाणी दररोज हजारो पर्यटक व भाविक भेट देत असतात. त्यातच लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी देखील या ठिकाणी येत असल्याने कार्यालयामार्फत त्यांना प्रोटोकॉल दिल्या जातो, व वेरूळ मंडळाधिकारी आणि तलाठी सजा वेरूळ यांना वारंवार त्या प्रोटोकॉल मध्ये जावे लागत असल्याने येथे असणाऱ्या सामान्य नागरिक, शेतकरी, वृद्ध, निराधार महिला व विद्यार्थ्यांची मोठी अडचण निर्माण होते परिणामी त्यांना वारंवार तलाठी सजा कार्यालयाच्या खेट्या माराव्या लागतात. तरी तहसीलदारांनी वेरूळ साठी खास एक प्रोटोकॉल अधिकारी नेमण्यात यावा व येथे असलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांची सेवा देण्यास कुठलाही अडथळा निर्माण होऊ नये म्हणून स करावा अशी मागणी वेरूळ येथील नागरिकांमधून होत आहे.

(खुलताबाद तालुक्यातील वेरूळ मंडळ अंतर्गत असलेले तलाठी सजा वेरूळ आणि वेरूळ मंडळ हे कायम बंद असते या ठिकाणी असलेल्या तलाठी सजा वेरूळ यांना संपर्क केला असता ते कायम प्रोटोकॉलवर असल्याचे सांगतात. परिणामी नागरिकांना सेवा मिळण्यास अडथळे निर्माण होत असून तहसीलदार साहेबांनी सेपरेट प्रोटोकॉल अधिकारी या ठिकाणी नेमण्याची गरज आहे. असल्याचे श्री सतीश देवेंद्र लोखंडे, वेरूळकर प्रदेश युवा संघटनमंत्री,आम आदमी पार्टी महाराष्ट्र यांचे मागणी आहे.

# स्फोटके बनवणाऱ्या कंपनीत स्फोट

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** जिल्ह्यातील वाडीपासून काही अंतरावर असलेल्या धामनाजवळील स्फोटकं बवणाऱ्या चामुंडा कंपनीत मोठा स्फोट होऊन त्यात पाच कामगार दगावले असून आठ ते दहा कामगार जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. दगावलेल्यामध्ये चार महिला कामगारांचा समावेश आहे. घटनास्थळी गर्दी झाल्यामुळे पोलिसांचा बंदोबस्त वाढविण्यात आला असून दगावलेल्या कामगारांच्या कुटुंबियांचा आक्रोश सुरू होता.

नागपूर जवळील धामना येथे स्फोटकं तयार करणारी चामुंडा कंपनी आहे. सकाळी दहा वाजता कंपनी सुरू झाल्यानंतर दुपारी १२.३० च्या सुमारास कंपनीत अचानक स्फोट झाल्यानंतर मोठा आवाज झाला. यावेळी कंपनीत १० ते १२ कामगार कामावर असताना त्यात ५ कामगारांचा कंपनीत मृत्यू झाला तर सात ते आठ कामगार गंभीर जखमी झाले असून त्यांना बाहेर काढण्यात आले आहे. दगावलेले कामगार वाडी आणि धामना परिसरात राहत असल्याची माहिती मिळाली असून त्यांचे नातेवाईक घटनास्थळी पोहोचले. घटनास्थळी पोहोचल्यानंतर त्यांनी आक्रोश सुरू केला.



# आ. किशोर जोरगेवार यांच्या हस्ते डायलिसिस विभागाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** क्राईस्ट हॉस्पिटल येथे सुरु करण्यात आलेल्या डायलिसीस विभागाचे आ. किशोर जोरगेवार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. विविध शासकिय योजने अंतर्गत आता या रुग्णालयात डायलिसीस ची सेवा उपलब्ध होणार असल्याचे यावेळी आमदार किशोर जोरगेवार म्हणाले. यावेळी डायोसिस ऑफ चांदा चे डायरेक्टर हेल्थ अपोस्टोलेट तथा वि जी. मा.फा. बेन्नी मुलौक्कल, भावना एनर्जी इन्फ्रास्ट्रक्चर चंद्रपूरचे मॅनेजींग डायरेक्टर, जॉर्ज कुट्टी लुकोस, केरला समाजमचे अध्यक्ष शाजी जॉन, काँग्रेसचे प्रदेश सचिव विजय नळे, क्राईस्ट हॉस्पिटलचे व्यवस्थापक मा. फा. फिलीप सी. एम. आय, मा. फा. जैसन आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

विविध शासकिय योजनांच्या माध्यमातून क्राईस्ट हॉस्पिटलमध्ये रुग्ण सेवा केल्या जात आहे. दरम्यान आज पासून सदर रुग्णालयात डायलिसीस सेवा सुरु करण्यात आली असून या डायलिसीस विभागाचे आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी घेण्यात आलेल्या छोटेखानी कार्यक्रमात बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, आज उपचारा करिता नागपूरकडे जाणाऱ्या रुग्णांच्या संख्येने लक्षणिय घट झाली आहे. याचे श्रेय चंद्रपूरातील शासकिय आणि खाजगी रुग्णालयांना जाते. आता प्रत्येक आजाराचे चंद्रपूर येथेच निदान झाले पाहिजे यासाठी येथील डॉक्टर प्रयत्न करत आहे. क्राईस्ट हॉस्पिटलमध्ये अनेक रुग्णांवर आपण शासकिय योजनांच्या माध्यमातून उपचार करुन दिला आहे. आज डायलिसीस मशीन येथे उपलब्ध झाल्याने येथील सुविधेत भर पडला असल्याचे आमदार किशोर जोरगेवार यावेळी म्हणाले. यावेळी रुग्णालयाची कर्मचा-यांची उपस्थिती होती.




# कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालयातील गुणवंतांचा गुणगौरव सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ कन्नड संचलित कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालयातील इयत्ता दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा व पालकांचा संस्था व विद्यालयाच्या वतीने गुणगौरव करण्यात आला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष श्रीमती ताराबाई कृष्णाराव जाधव सचिव सागर जाधव पालक प्रतिनिधी विश्वनाथ शहरवाले प्राध्यापक रामनाथ टेकाळे मुख्याध्यापक रवींद्र पाटील यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. तालुक्यातून सर्वप्रथम आलेली कृष्णराव काशिनाथराव शाळेची विद्यार्थिनी कृतिका सोनवणे 96.40 हिचा व पालकांचा सत्कार यावेळी करण्यात आला. आहे यावेळी बारावी विज्ञान शाखेत

पलक शहरवाले 90.17 वेदिका टेकाळे 89.50 आरती वाघ 88.33 रुजल पवार 87.67 ऋतुजा उसरे 85.33 कला शाखेतील रेणुका दिलीप गोंडे, दहावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी अनिल ठोकळ 94% शिंदे मयुरी संतोष 92.20% खरे ज्ञानेश्वरी रामदास 90.40% धोत्रे ज्ञानेश्वरी 89.60 कवडे पूर्वा 89.40 काळे गौरी 87.20 पवार संस्कृती शरद, पवार कनिष्क भाईदास, मोनिका मोहिते, प्रणाली कुणाल सोनवणे, सातदिवे श्रावणी, वाघ श्रुती यांचा व गुणवंत विद्यार्थी व पालकांचा संस्था व कर्मवीर काकासाहेब देशमुख विद्यालय यांच्यावतीने गुणगौरव करण्यात आला यावेळी मोठ्या संख्येने पालक व विद्यार्थी हजर होते कार्यक्रमासाठी विद्यालयातील मुख्यध्यापक रवींद्र पाटील शिरसाठ डवारे संतोष परदेशी भागवत पल्हाड उखाराम सोनवणे आनंद बागुल यांची उपस्थिती होती प्राध्यापक टेकाळे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व संस्थेचे सचिव सागर जाधव यांनी विविध स्पर्धा परीक्षेसाठी यशस्वी होण्यासाठी मेहनत चिकाटी जिद्द व अभ्यासातील सातत्य ठेवण्यात त्यांचा आवश्यक आहे असे सांगितले कार्यक्रमाचे संचालन प्रदीप सनंसे यांनी केले तर आभार संजय शिरसाठ यांनी मानले.



# बुद्धीजमच्या बळावरच संविधानाची निर्मिती

## ज. वि. पवार : बार्टीकडून होत असलेल्या संविधान प्रसार कार्याचे कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** भारताची राज्यघटना ही जगातील सर्वश्रेष्ठ आणि प्रदिर्घ लिखित राज्यघटना मानली जाते. विविध धर्म, पंथ, समुदाय, प्रांत, भाषा असुनही भारतीयांमध्ये एकता आणि एकात्मता संविधानिक मुल्य ही श्रेष्ठ असल्याचे दिसून येते. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बुद्धीजमच्या बळावरच आपल्या देशाच्या संविधानाची निर्मिती केली. संविधानाने या देशातील जनतेला त्यांचे मुलभूत अधिकार व कर्तव्ये बहाल केली. ज्या ज्या देशांनी बुद्धीजम स्वीकारला ते प्रगतीच्या शिखरावर विराजमान झाले, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत व पँथर ज.वि.पवार यांनी केले. संविधान उद्देशिका वाचन या अभिनव उपक्रमास शुभेच्छा देण्यासाठी ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत पँथर ज.वि. पवार हे दिनांक ११ जून २०२४ रोजी बार्टी संस्थेत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे येथे मागिल एक वर्षापासून दररोज सकाळी दहा वाजता संविधान प्रास्ताविकेचे वाचन आणि तद्नंतर दहा मिनिटे आनापान केले जाते. बार्टी संस्थेचे महासंचालक सुनिल वारे यांच्या संकल्पनेतून सदरचा उपक्रम सुरू असुन महाभीमकाव्य हा उपक्रमही त्यांनी हाती घेतला आहे.संविधानाचा प्रसार व प्रचार विद्यार्थी व नागरिकांमध्ये होणे अत्यंत महत्त्वाचे असुन बार्टी संस्थेचे महासंचालक सुनिल वारे यांच्या पुढाकाराने बार्टीत दररोज संविधान उद्देशिकेचे सामुहिकपणे वाचन केले जाते.हा राज्यातील अभिनव उपक्रम सुरू केल्याबद्दल ज.वि.पवार यांनी सुनील वारे यांचे अभिनंदन केले.बार्टी संस्थेच्या वतीने घर घर संविधान,संविधान जनजागृती अभियान राबविण्यात येत असल्याचे व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनेक पैलूंवर बार्टी संशोधनात्मक कार्य करत असल्याचे सुनील वारे यांनी सांगितले. संविधान कक्षामार्फत राज्यभर संविधान जनजागृती अभियान तसेच प्रकाशन व प्रसिद्धी विभागामार्फत अल्प दरात संविधान, उद्देशिका नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येते. असे ही सांगण्यात आले. ज.वि.पवार यांनी महासंचालक यांना बार्टी ग्रंथालयासाठी स्वयंलिखित पुस्तकांचा संच भेट दिला. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक सुबोध मोरे, निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, विभागप्रमुख श्रीमती वृषाली शिंदे, अनिल कारंडे, शुभांगी पाटील यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचलन प्रकल्प व्यवस्थापक सुमेध थोरात यांनी केले. आभार प्रकाशन विभागाचे रामदास लोखंडे यांनी मानले.

# मनोज जरांगे यांच्या उपोषणाची तत्काळ दखल घेण्याची मराठा समाजाची मागणी

## मुख्यमंत्री शिंदे यांना मराठा समाजाच्या वतीने निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**बि.डी. रामपूरकर**

**जिंतूर :** मराठा योद्धा मनोज जरांगे यांचे अंतरवाली सराटी येथे मागील चार दिवसांपासून सुरू असलेल्या उपोषणाची तात्काळ दखल घेऊन त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याची मागणी जिंतूर तालुक्यातील सकल मराठा समाजाच्या वतीने जिंतूर तहसीलदार यांच्यामार्फत मुख्यमंत्री यांना देण्यात आलेल्या निवेदनामध्ये केली आहे.सकल मराठा समाज जिंतूर यांच्या वतीने मराठा समाजाचा तात्काळ ओबीसी मध्ये समावेश करण्यासाठी आपण काढलेली अधिसूचनेचे लवकरात लवकर कायद्यामध्ये रूपांतर करून मराठा समाजावर होत असलेला अन्याय दूर करावा या मागणीसाठी आंतरवाली सराटी येथे मागील चार दिवसांपासून सन्माननीय जरांगे पाटील आमरण उपोषण करत असून आपले असंवेदनशील सरकार त्याची साधी दखलही घेत नसल्यामुळे मराठा समाजामध्ये आपल्याविषयी व आपल्या सरकार विषयी प्रचंड प्रमाणात असंतोष निर्माण होत आहे म्हणून आपल्या या असंवेदनशील कृतीचे सकल मराठा समाज जिंतूर यांच्या वतीने प्रथमतःनिषेध करण्यात येतो. निवेदनाद्वारे सरकारला विनंती देखील करण्यात आली की आपण आजच स्वतः अंतरवाली सराटी येथे जाऊन मराठा समाजाच्या संपूर्ण मागण्या पूर्ण करून आपण वाशी येथे काढलेल्या अधिसूचनेचे कायद्यामध्ये रूपांतर करावे आणि जरांगे पाटिल यांचे आमरण उपोषण सोडवावे नसता आपणास यापुढे मराठा समाजाच्या तीव्र असंतोषास सामोरे जावे लागेल. आणि त्याचबरोबर मराठा समाज यापुढे लोकशाही पद्धतीने तीव्र स्वरूपात आंदोलने मोर्चे इत्यादी करेल त्याच्या परिणामाची संपूर्णतः जबाबदारी सरकार म्हणून आपणावर राहील. असा इशारा हि यावेळी देण्यात आलेल्या निवेदनामध्ये सकल मराठा समाजाच्या वतीने देण्यात आला आहे.

**उपोषणाचा दुसरा दिवस :** सगेसोयरे अध्यादेशाची तातडीने अमलबजावणी करावी यासाठी अंतरवली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांनी आमरण उपोषण सुरु केले आहे त्यांना पाठिंबा देण्यासाठी शहरातील तहसील कार्यालय परिसरात पंढरीनाथ शिंदे, माजी सैनिक बालाजी शिंदे, शशिकांत चौधरी व किशोर घुसळे यांनी उपोषण सुरु केले असून उपोषणाचा दुसरा दिवस आहे.



# युवा पिढीने वृक्षरोपनासारखे समाजकार्य हाती घ्यावे; उपमुख्य कार्यकारी अधिकारी शेवाळे

आधुनिक केसरी न्यूज

**शहरटाकळी :** युवा पिढीने वृक्षरोपना सारखे समाज कार्य हाती घ्यावे, वृक्षरोपण करून त्याचे जतन, संवर्धन करणे ही आजच्या काळाची गरज बनली असून हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठान चे वृक्षरोपणाचे हे सामजिक कार्य समाजाला आदर्शवत व प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी समर्थ शेवाळे (सामान्य प्रशासन) यांनी केले. शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात 'हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठान' च्या वतीने जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी समर्थ शेवाळे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी शेवाळे बोलत होते, यावेळी विद्यालयाचे प्राचार्य कांतेश्वर ढोले सर, पंचायत समिती गटविकास अधिकारी राजेश कदम, ग्रामविकास अधिकारी सुभाष गर्जे, हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठान चे रामचंद्र गिरम,रविंद्र मडके, मा. ग्रामपंचयत सदस्थ महेश भालेराव, राजेंद्र खंडागळे, सुभाष बरबडे, माजी उप सरपंच भाऊसाहेब राजळे, वसंत कावले, प्रवीण लद्धे सर उपस्थित होते, प्रास्तविक भाषणात प्राचार्य कांतेश्वर ढोले सर यांनी शालेय परिसरात शेकडो वृक्षांचे रोपण करून त्याचे जतन व संवर्धन चांगल्या केली जात असल्याचे सांगितले, सूत्रसंचालन रावसाहेब गायकवाड सर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रवीण लध्दे सर यांनी मानले.



# सिंचन विहिरीच्या उद्दीष्ट पुर्ततेत तालुका दुसऱ्या स्थानावर

## जिल्हाधिकारी यांची कर्मचाऱ्यांना शाब्बासकीची थाप..!

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** जिल्ह्यामधे रोजगार हमी योजना अंतर्गत जिल्हाधिकारी यांच्या नेतृत्वात जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील शेतकरी आर्थिक दृष्ट्या सक्षम होण्यासाठी शेतकऱ्यांना शेतीसाठी सिंचनाची व्यवस्था असणे तितकेच गरजेचे आहे. रिसोड तालुक्यातील शेतकऱ्यांना सिंचन विहीरीचे उद्दीष्ट पुर्तता बाबतीत रिसोड तालुका हा जिल्ह्यात दुसऱ्या क्रमांकावर असल्याने रिसोड तालुक्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी, रोजगार सेवकांचा सत्कार करत जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी रिसोड येथे चांगले काम केल्या बद्दल शाब्बासकीची थाप देत सत्कार केला आहे.रिसोड पंचायत समितीला कायम गट विकास अधिकारी नसल्याने लाभार्थ्यांची कामे खोळंबली होती. पंचायत समितीचा कारभार प्रभारिंच्या खांद्यावर असल्याने ग्रामीण विकासाला खीळ या मथळ्याखाली दैनिक आधुनिक केसरीने वृत्त प्रकाशित केले होते त्या वृत्ताची दखल घेत प्रमोद बदरके हे दिनाक 2 जानेवारी 24 रोजी रुजू झाले होते. त्यांनी सूत्रे हाती घेताच मात्र कामांचा सपाटा लावला.



रिसोड येथील पंचायत समितीच्या सभागृहा मध्ये नुकतीच भुवनेश्वरी एस.जिल्हाधिकारी यांनी नरेगा विभागाची आढावा सभा घेतली त्यावेळेस श्रीमती तेजनकर मॅडम तहसीलदार,ग्रामसेवक,रोजगार सेवक व पंचायत समिती गटविकास अधिकारी प्रमोद बदरके, एपीओ, कैलास बेद्रे, तसेच पी.टी.ओ. भगत, मिटकरी,वैभव रावले,श्रीमती ज्ञानज्योती मॅडम,तसेच नरेगा विभागाचे वायभासे कनिष्ठ सहाय्यक उपस्थित होते.

जिल्हाधिकारी यांनी तालुक्यातील सिंचन विहिरीचा आढावा घेऊन ज्या ग्रामपंचायतने लक्ष्यांकाप्रमाणे सिंचन विहिरी चालु केल्या अशा ग्रामपंचायती मधील ग्रामसेवक,रोजगार सेवक, यांचे पुष्पगुच्छ देत स्वागत केले व ज्या ग्रामपंचायतीने सिंचन विहिरीचे लक्षांकानुसार कामे सुरू केली नाहीत अशा ग्रामपंचायत सचिवांनी कामे त्वरित सुरू करण्याबाबत सक्त सुचना दिल्या.जिल्ह्यातील सिंचन विहीरीची कामे प्राधान्याने करण्यामध्ये रिसोड पंचायत समितीचे गट विकास अधिकारी प्रमोद बदरके यांच्या नेतृत्वात द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे. ही बाब निश्चितच रिसोड तालुक्यातील शेतीसिंचनासाठी भुषणावह ठरणारी आहे.

> रिसोड पंचायत समितीचा गटविकास अधिकारी या पदाचा 2 जानेवारी 2024 रोजी प्रभार घेतला असता अनेक योजनांची विविध कामे ही प्रलंबीत होती . यामधे अनेक वेळा कर्मचाऱ्यांच्या सभा घेऊन प्रलंबीत प्रश्न मार्गी लावत नरेगा मधे जिल्ह्यात रिसोड तालुका दुसऱ्या स्थानावर पोचला हे कुण्या एकट्याचे काम नसून सांघिक काम आहे .यामधे सर्वच कर्मचाऱ्याचे मोलाचे योगदान आहे .
> **प्रमोद बदरके गटविकास अधिकारी प . स .रिसोड**



# बासर येथे ऐतिहासिक सामूहिक सरस्वती पूजन, विद्यारंभ संस्कार सोहळ्याचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** दिंडोरी प्रणित अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ केंद्रातर्फे परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांचे आशीर्वाद व मार्गदर्शनाने दि.१६ व १७ जून २०२४रोजी बालसंस्कार व युवा प्रबोधन विभागाच्या वतीने तेलंगणातील श्रीक्षेत्र बासर येथे गुरुमाऊलीच्या उपस्थितीत सरस्वती माता सामूहिक पूजन सोहळा व विद्यारंभ संस्कार सोहळ्याचे आयोजन केले आहे. तरी या ऐतिहासिक सोहळ्यास जास्तीत जास्त सेवेकऱ्यांनी आपल्या मुलांसह उपस्थित रहावे असे आवाहन लोह्यातील मुख्य केंद्र सेवेकरांच्या वतीने करण्यात आले आहे.

आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये श्री सरस्वती मातेला ज्ञान माता विद्या देवता म्हणून पहिले स्थान दिले जाते. सरस्वती पूजन सोहळ्याच्या माध्यमातून मुलांच्या मनात भक्ती आणि नैतिक मूल्यांची शिकवण रुजू करून विधायक हेतू साध्य होणार आहे. या उपक्रमात शाळकरी मुले,तरुणाने व पालक तसेच शिक्षक एकत्रित पणे सरस्वती मातेची पूजा करतील. भव्य दिव्य अशा नेत्र सुख देणारा अमूल्य ठेवा सेवेकरांच्या प्रयत्नातून अनुभवता येणार आहे. या राष्ट्रीय सोहळ्यासाठी महाराष्ट्र व पर राज्यातील सेवेकरी मोठ्या प्रमाणात सेवेसाठी उपस्थित राहणार असून लोहा तालुक्यातील जास्तीत जास्त सेवेकरी उपस्थित राहावेत यासाठी दि.१३ रोजी लोह्यातील श्री स्वामी समर्थ मुख्ये केंद्रामध्ये गुरुपीठ प्रतिनिधींनी बासर सेवेचा व अठरा विभागाचे महत्त्व उपस्थित सर्व सेवेकऱ्यांना अत्यंत चांगल्या पद्धतीने समजून सांगितले या वेळी मोठ्या संख्येने महिला व पुरुष सेवेकरी उपस्थित होते. तसेच बासर येथे होणाऱ्या ऐतिहासिक सोहळ्यास लोह्यातील जास्तीत जास्त सेवेकरांनी उपस्थित राहण्याचे आवाहन स्थानिक सेवेकऱ्यांनी केले आहे.

# सावरखेडा येथे जलसमृद्ध गाव अभियान अंतर्गत विहीर पुनर्भरण कामाचा शुभारंभ

## तहसीलदार मनीषा मेने यांच्या हस्ते सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मौजे सावरखेडा येथे जलसमृद्ध गाव अभियान अंतर्गत विहीर पुनर्भरण कामाचा शुभारंभ सोयगाव तहसीलदार मनीषा मेने यांच्या हस्ते प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली.यंदाच्या उन्हाळ्यात ज्या ज्या गावात टँकरने पाणी पुरवठा करावा लागला त्या प्रत्येक गावात जलसमृद्ध गाव अभियान राबवावे. पाण्याचा थेंब न थेंब अडवावा. गाव खऱ्या अर्थाने जलसमृद्ध करावे. लोकांचा सहभाग घेऊन जलसमृद्ध गाव अभियान हे खऱ्या अर्थाने 'लोकचळवळ' व्हावे, असे निर्देश छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज ग्रामसेवक, तलाठी आणि कृषी सहायक या ग्रामस्तरावरील कर्मचाऱ्यांना दिले.

सोयगाव तालुक्यातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी राबवावयाच्या प्रभावी उपाययोजनेच भाग म्हणून जलपुनर्भरणाच्या उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. त्यासाठी यंदा ज्या गावांत टँकरने पाणी पुरवठा करावा लागला अशा गावांची प्राधान्याने निवड करण्यात येत आहे. त्यासाठी गावागावात पर्यावरण दिना (दि.५) पासून जनजागृती व नियोजन बैठकांचे सत्र सुरु झाले आहे. नियोजनानुसार दि.६ ते १३ या दरम्यान गावागावांत प्रत्यक्ष करावयाच्या कामाचा, पुनर्भरण करावयाच्या विहीरी, बोअरवेल, पर्जन्यजल साठवण इ. उपायोजना राबवावयाच्या शासकीय, खाजगी इमारती, घरे यांची माहिती संकलित केली जाणार आहे.जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या निर्देशानुसार सोयगाव तहसीलदार मनीषा मेने यांनी ज्या ज्या गावात भिषण पाणी टंचाई आहे,तर काही गावात टँकर द्वारे नागरिकांना पिण्याच्या पाणी पुरवठा केला जातो अशा गावात प्रत्यक्ष पाहणी करुन सुरुवात करण्यात आली आहे.अत्यंत कमी खर्चात व कमी संसाधनात हा अत्यंत प्रभावी उपचार असून तो राबविल्याने त्या त्या परिसरातील भूजल पातळीत वाढ हमखास होऊन भविष्यात भेडसावणाऱ्या पाणीटंचाईवर आपण सहज मात करु शकतो, असे सोयगाव तहसीलदार मनीषा मेने यांनी सांगितले आहे. तहसीलदार मनीषा मेने म्हणाले की, जलपुनर्भरणाची करावयाची ही अत्यंत साधी सोपी पद्धत आहे. यातील अनेक कामे ही मनरेगा मध्ये सहज घेता येतात. त्याचे नियोजन यंत्रणेने करावे. याअभियानाला वृक्ष रोपणाची जोड द्यावी. लोकांचा सहभाग सर्वात महत्त्वाचा आहे. त्यासाठी गावात बैठका घेऊन लोकांना या अभियानात सहभागी होण्यासाठी आवाहन करा.मनीषा मेने म्हणाल्या कि सोयगाव तालुक्यात जलसमृद्धीसाठी आपण सगळ्यांनी मिळून प्रयत्न करा. गावांतील शासकीय इमारती, घरे, सार्वजनिक विहीरी, कुपनलिका यांचे पुनर्भरण करुन पावसाच्या पडणाऱ्या पाण्याचा थेंब न थेंब जिरवून पुनर्भरण करावे. लोकांना या विषयाचे महत्त्व पटवून द्या. जलसमृद्ध अभियान हे लोकचळवळ व्हावे, इतका लोकसहभाग मिळवा, असे निर्देशही तहसीलदार मनीषा मेने  सावरखेडा येथे बोलताना सांगितले आहे.



# भाजपातर्फे फटाके फोडून जल्लोष साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सावळदबारा येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्ली येथील राष्ट्रपती भवन तिसऱ्यांदा पंतप्रधान पदाची शपथ विधी पार पडला. त्यांनी शपथ घेताच कोलते पाटील यांच्या नेतृत्वात त्यांच्या कार्यालय समोर जोरदार जल्लोष करण्यात आला. लोकसभेत भारतीय जनता पक्ष आणि इतर घटक पक्षांना देशातील जनतेने प्रचंड प्रतिसाद दिल्याने. पंतप्रानपदासाठी पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारताची सूत्र सोपवली. मागील १० वर्षात केलेल्या त्यांच्या कामावर विश्वास ठेवत जनतेने पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांच्या गळ्यात पंतप्रधान पदाची माळ घातली. याचा आनंद साजरा करण्यासाठी भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीच्या वतीने सावळदबारा मतदार संघातील त्यांच्या चक्रधर स्वामी मंदिर चौक,जय भवानी चौक व छत्रपती शिवाजी महाराज चौक  येथे भव्य असे जल्लोष साजरा करुन मिठाई वाटप करण्यात आली.यावेळी भाऊराव कोलते पाटील,जिल्हा उपाध्यक्ष गणेश लोखंडे,तालुका अध्यक्ष शांताराम खराटे, ईश्वर कोळपे, मनोज बुढाळ, पंढरी साबळे, दिपक मानकर, रामचंद्र चिमणकर, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्रीब्रह्मविद्या पाठशाळेकडून ऑनलाईन निबंध लेखन उपक्रम; ७० महानुभाव पंथी अनुयायी सहभागी

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**तरडगाव :** श्रीब्रह्मविद्या पाठशाळा,महानुभाव आश्रम तरडगांव (ता.फलटण) येथील या संस्थेच्या वतीने "ऑनलाईन निबंध लेखन" उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा उपक्रम या संस्थेचे संचालक महंत श्रीराहेरकरबाबा महानुभाव यांच्या मार्गदर्शनातून  घेण्यात आला होता.या उपक्रमामुळे अनेकांना विचार मांडण्याचे माध्यम उपलब्ध झाल्याने या उपक्रमाचे विशेष कौतुक होऊ लागले आहे.दि.१ जून २०२४ ते १० जून २०२४ या कालावधीत घेण्यात आलेल्या उपक्रमातून महाराष्ट्रातील एकुण  ७० महानुभाव पंथीय अनुयायी सहभागी झाले होते.त्यांपैकी १८ अनुयायींनी प्रथम श्रेणी प्राप्त केली.अशी महत्त्वपूर्ण माहिती निंबध लेखन उपक्रमाचे कार्यसंयोजक प्रमोददादा राहेरकर महानुभाव यांनी दिली.जागर सर्वज्ञांच्या विचारांचा.. अभिमान मराठी भाषेचा...या घोष वाक्यातून हा निंबध लेखन उपक्रम ज्ञान मिळविण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरला आहे.महानुभाव पंथ, सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींचे कार्य,महाराष्ट्र आणि मराठी भाषा,आमुचे आदर्श पूर्वज या चार मुख्य विषयावर आधारित निंबध लेखनाचा विषय देण्यात आला होता.महानुभाव पंथाचे संस्थापक सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींचे तत्वज्ञानरुपी विचारांचे चिंतन मंथन व्हावे तसेच महानुभाव पंथाचा विचार स्मरणीय रहावा या दृष्टिकोनातून पंथीय अनुयायी यांची वैचारिक अध्यात्मिक साधना वृद्धींगत होण्यासाठी निबंध लेखन उपक्रमाचे आयोजन केले होते.प्रथम श्रेणी



पुरुष गटातून जयंत वाघमारे (अकोला), संजय परळीकर (खारघर, मुंबई), प्रभाकर शेळके (जालना) ज्ञानेश्वर वारके (पुणे), अनिकेत साप्ते (पिसावरे जि.पुणे) तसेच प्रथम श्रेणी महिला गटातून दिपाली देशमुख (संभाजीनगर),सुजाता मुंडे (धाराशिव), रोशनी हिवसे (अंजनगाव जि.अमरावती), निलम भोसले (जवळे जि.सातारा), रत्नप्रभा अडसुळ (विठ्ठलवाडी जि.सातारा), अर्पणा भोळे (मुंबई), संध्या राणे (बदलापूर), चैताली पाटील (डोंबिवली), ज्ञानेश्वरी टोळे (डोंबिवली), दिपाली थोपटे (पुणे), रुपाली शेलार (पुणे), धनश्री सुतार (पुणे), गुंजन हिवसे (धनगाव जि.अमरावती) आदींनी यश मिळविले.

या यशाबद्दल तसेच सहभागी झालेल्या सर्वांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

साहित्य, समाज आणि धार्मिक संस्कृती या संकल्पना मात्र परिवर्तनाची साक्ष देत राहतील. या महाराष्ट्राच्या मातीवर, मराठी लोक भाषेवर सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींचा विचार अबाधित राहील. सात्वीक अध्यात्मिक विचारांचा वारसा आणि संस्कारक्षम नितिमूल्यांचं बाळकडू इथल्या असंख्य पिढ्यांना निरंतर मिळत राहतील. महानुभाव पंथाचा आद्यग्रंथ लीळाचरित्र या ग्रंथाच्या वैचारिक चिंतन मंथनातून सर्वज्ञांचा विचार जगभर गर्जत राहील. असा विश्वास आयोजकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. सर्वज्ञांच्या विचारांचा जागर करीत अभ्यासपूर्ण विषयाची मांडणी, लेखणीचे कौशल्य, विचारांची प्रगल्भता, सामाजिक व तात्विक संदर्भ, शब्दाच्या सौंदर्यातून जपलेली मराठी अस्मिता, निबंधाच्या प्रारंभापासून ते समारोपापर्यंतचे मुद्देसूद सादरीकरण अशा विविध पैलूंनी साकारलेला व वैचारिक मंथनातून शब्दांना आकार देण्याचे काम या निबंध लेखन उपक्रमातून करण्यात आल्याने श्रीब्रह्मविद्या पाठशाळा तरडगाव संस्थेच्या वतीने विशेष समाधान व्यक्त करण्यात आलेले आहे.

# चंद्रपूर जि.प.च्या अर्थसंकल्पात शिक्षण, कृषी, आरोग्य आणि पायाभूत सुविधांवर विशेष भर

## सन 2024-25 च्या मूळ अर्थसंकल्पास सर्वसाधारण सभेत मंजुरी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या सन 2024-25 च्या मुळ अंदाजपत्रकात 28 कोटी 11 लक्ष रुपयांचा महसुली उत्पनाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. या अर्थसंकल्पात जिल्ह्यातील ग्रामीण भागाच्या विकासाला प्राधान्य देण्यात आले असून जिल्हा परिषदेच्या विविध विभागाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांनवर भरघोस आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. यात शिक्षण, कृषी, आरोग्य, महिला व बालकल्याण, पाणी पुरवठा आदींचा समावेश आहे.

**शिक्षण विभाग :** अर्थसंकल्पात या विभागाकरीता 1 कोटी 3 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली असून यामध्ये विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टीकोन उंचावण्याकरीता इसरो सारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या वैज्ञानिक संस्थांना भेटी करीता सहलीचे आयोजन करण्याचे नियोजित आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांच्या नाविण्यपूर्ण संकल्पनेतून मिशन भरारी 3.0 राबवून जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षेकरीता तयार करण्यावर भर देण्यात आला आहे. शालेय क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धेची जाणीव निमार्ण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**आरोग्य विभाग :** जि.प. आरोग्य विभागासाठी 4 कोटी 10 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये साथरोग, ग्रामीण भागातील गरजू लोकांना मोफत नेत्र तपासणी शिबीर व चष्मे वाटप करणे, दुर्धर आजाराने पिडीत व्यक्तींना शस्त्रक्रिया व औषधोपचार करीता अर्थसहाय्य, ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना सुविधायुक्त करून सुसज्ज करण्यावर भर देण्यात आला.

**महिला व बालकल्याण विभाग :** या विभागाकरीता 1 कोटी 4 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली असून यामध्ये अंगणवाडी केंद्राचे बळकटीकरण व लहान मुलांच्या शारीरिक विकासाकरीता बाहय परिसरात खेळणी बसविणे, अंगणवाडी केंद्रातील 6 महिने ते 3 वर्ष व 3 वर्ष ते 6 वर्ष वयोगटातील मुला/ मुलींना अंगणवाडी केंद्रामार्फत पोषण आहार उपलब्ध करून कुपोषण टाळण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. ग्रामीण भागातील महिलांना/ मुलींना सक्षम करण्याकरीता जुडो कराटे, ब्युटी पार्लर, संगणक प्रशिक्षण, शिवणकाम, सायकल वाटप या सारख्या योजना राबवून महिला सक्षमीकरणावर भर देण्यात आला आहे.

**समाजकल्याण विभाग :** या अंतर्गत मागासवर्गीयांकरीता विविध प्रकारच्या वैयक्तीक लाभाच्या योजना व दिव्यांग कल्याणासाठी 3 कोटी रुपयांची तरतूद आली आहे. तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती करीता तरतूद करण्यात आली आहे.

**कृषी विभाग :** जि.प.च्या अर्थसंकल्पात कृषी विभागासाठी 1 कोटी 11 लक्षाची तरतूद करण्यात आली असून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना जैविक शेती करीता प्रोत्साहित करून शेतीच्या उत्पन्न वाढीवर भर देण्यात आला आहे. ग्रामीण भागातील तलाव दुरुस्ती व सौंदर्यीकरणाकरीता रुपये 1 कोटी 40 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

**बांधकाम विभाग :** या अंतर्गत ग्रामीण भागातील विकास कामाकरीता 4 कोटी 17 लक्ष रु. च्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. ग्रामीण पाणी पुरवठा विभागाअंतर्गत प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्तीच्या माध्यमातून गावांना शुद्ध पाण्याचा पुरवठा व्हावा, याकरिता 2 कोटी 8 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली असून सोबतच पाणी टंचाईकरीता बोरवेल व हातपंपाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्याचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) यांनी कळविले आहे.



## चौथ्या दिवशीही पाऊस; वीज कोसळली

आधुनिक केसरी न्यूज

**सोनई :** गेल्या काही दिवसापासून सलग चार दिवसापासून कधी सकाळी, कधी दुपारी, कधी सायंकाळी, कधी रात्री दमदार पाऊस पडत असताना काल सकाळी सकाळी साडेसातच्या सुमारास वीज कोसल्याची घटना घडली. दुर्दयाने जीवित हानी झालेली नाही.

याबाबत माहिती की, वंजरवाडी येथील रहिवासी असलेल्या लहू सोपान दराडे यांच्या घरासमोर असलेल्या उंच नारळाच्या झाडावर वीज कोसळली आणि त्या झाडातून वीजप्रवाह होऊन घरातील इंव्हटर जळून खाक झाले आहे. सुद्वायावयाने जीवित हानी झाली नाही, मात्र तेथे असलेले त्यांच्या मातोश्री व भावजयी काही क्षणात डोळे अंधारमय होऊन घबराट उडाली होती. शेजारी असलेल्या संभाजी दराडे, साहेबराव दराडे, सुभाष दराडे यांचेही कुटुंब बचावले आहे.पाऊस पडत असल्याने बळीराजा सुखावला आहे. शेती मशागती होऊन शेतकरी शेतीकडे लक्ष देताना दिसत आहे. यंदाच्या वर्षी सर्वात अधिक तापमानाची नोंद झाली होती. आता चार दिवसापासून विजेसह पावसाच्या सरी कोसळत आहे.मृग नक्षत्र वेळेवर पडला आहे, त्यामुळे शेतकरी सुखावला आहे. सोनई परिसरात रोजच पाऊस पडत असल्याने, दरम्यान दिवसभर ढगाळ वातावरण अजूनही कायम आहे.

## भुमी कायरकर संयुक्त राष्ट्रसंघ वातावरण बदल पुरस्काराची मानकरी

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** संयुक्त राष्ट्र शिक्षण, सायन्स, संस्कृती संघटना क्लब द्वारा जगातील 150 जास्त देशातील विद्यार्थी व युवकांना जगाला भेडसवणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी व ते करीत असलेल्या लक्ष गाठण्यासाठीच्या कार्याचे व उपायांची माहिती दूरदृश्य प्रणाली द्वारे पाठविण्याचे आव्हान करण्यात आले होते.

हे लक्ष (GOALS) 1) गरिबी 2) भुकबळी 3) सुदृढ स्वास्थ्य 4) उच्चस्तर शिक्षा 5) लिंग समानता 6) वातावरण बदल सारख्या 17 समस्या व बिंदूवर आधारित होत्या.

वृक्षाई या आपल्या संस्थेद्वारे मागिल 18 वर्षांपासून इरई नदी मध्ये गाळ साचल्याने नदी मृतावस्थेत जात असून उन्हाळ्यात नागरिकांच्या विहीर व बोरिंग कोरड्या पडत असल्यामुळे मोठया प्रमाणात पाणी टंचाई व याउलट पावसाळ्यात महापुरा सारख्या संकटाला समोर जाव लागत असल्यामुळे खोलीकरण करणे हाच उपाय सुचविला होता व 28 वर्षांपासून पर्यावरण रक्षणासाठी, जनतेमध्ये पर्यावरण व सामाजिक दातृत्वाची जनजागृती करण्यासाठी करीत असलेल्या कार्याची संशिप्त माहिती दिली होती. त्यात तिची निवड करुन तीला प्रशस्ती पत्र दुरप्रणाली द्वारे पाठविण्यात आले. भूमी ही यावर्षी 12 वि बि.जे.एम.कार्मेल अकादमीची विद्यार्थिनी आहे. या विद्यार्थिनी -युवकांनी सुचविलेल्या उपायावर समस्त जगातील प्रतिनिधीशी विस्तृत चर्चा करुन संयुक्त राष्ट्र संघ हे उपाय संपूर्ण जगात कराव्यान्वित करतात.जगाला भेडसावणाऱ्या 17 समस्या वा बिंदूवर जगातील 150 हुन जास्त देशातील 5000 हुन जास्त विद्यार्थी-युवकांनी यात भाग घेतला होता. आपले वडील कुशाब व भाऊ ट्री बॉय अजिंक्य कायरकर हे वृक्षारोपण-पर्यावरण रक्षण करिता 28 वर्षांपासून कार्यरत असून व त्यांच्या कडे अनेक सृष्टी रक्षणाच्या कल्पना असूनही ते राष्ट्रीय-अंतरराष्ट्रीय व्यासपीठावर मांडत नसल्याने ही जिम्मेदारी मी घेऊन UNESCO च्या मंचावर त्या कल्पना मांडल्याने समाधान मिळाल्याचे भुमी कायरकर दै. आधुनिक केसरीला सांगितले.




## दहशतवाद्यांनी वैष्णोदेवी येथे यात्रेकरूंवर केलेल्या हल्ल्याचा विहिंपच्या वतीने निषेध

आधुनिक केसरी न्यूज



**नेवासा :** दि.९ जून रोजी जम्मू-काश्मीरमधील वैष्णोदेवी कटरा ते शिव खोडी येथे जात असताना पाक जिहादी दहशतवादयांनी केलेल्या हिंदू भाविकांच्या बसवरील यात्रेकरूंवर केलेल्या क्रूर हल्याचा नेवासा येथील विश्व हिंदू परिषदेच्या वतीने निषेध केला असून केंद्र सरकारने अशा प्रकारच्या कारवाया पूर्णतः नियंत्रणात ठेवण्यासाठी निर्णायक आणि कठोर पावले उचलावीत अशी मागणी केली आहे. नेवासा पोलीस स्टेशन व तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात विश्व हिंदू परिषदेने म्हटले आहे की इस्लामिक जिहादी दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात दहा निष्पाप हिंदू यात्रेकरू मारले गेले,संपूर्ण देशाला हादरवून टाकणारी ही घटना असून या क्रूर गुन्ह्यामुळे संपूर्ण देश दुखावला आहे. बराच काळापासून जम्मू-काश्मीरला पाकिस्तानने पोसलेल्या दहशतवादाचा सामना करावा लागत आहे, कलम ३७० हटवल्यानंतर आशेचा किरण निर्माण झाला आहे, पण दहशतवाद्यांचे मनोधैर्य अजून कमी झालेले नाही, हिंदूंना खुणावून मारण्याच्या घटना वाढल्या आहेत, या सगळ्यामागे पाकिस्तानचा हात आहे. देशाच्या नव्या सरकारच्या शपथविधीवेळी असे धाडसी कृत्य करून इस्लामी दहशतवाद्यांनी देशाच्या सार्वभौमत्वाला आव्हान दिले आहे. बजरंग दलाने मारल्या गेलेल्या हिंदू यात्रेकरूंना श्रद्धांजली अर्पण केली परंतु या घृणास्पद कृत्याबद्दल तीव्र संताप व्यक्त केला, केंद्र सरकारने अशा प्रकारच्या कारवाया पूर्णतः नियंत्रणात ठेवण्यासाठी निर्णायक आणि कठोर पावले उचलावीत आणि अशा घटकांना आश्रय देणाऱ्या अंतर्गत आणि परदेशी घटकांवरही कठोर आणि योग्य कारवाई करण्यात यावी अशी मागणी विश्व हिंदू परिषदेने केली आहे. सदरचे निवेदन महामहिमा राष्ट्रपती, जिल्हा पोलीस अधीक्षक, पोलिस निरीक्षक व तहसीलदार यांना देण्यात आले आहे. निवेदन देतेवेळी विश्व हिंदू परिषदेचे नेवासा तालुका प्रखंड प्रमुख प्रशांत बहिरट, आकाश गायकवाड, शुभम गव्हाणे, उमेश ठाणगे आदि उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# सुलतानपूर येथे मुंबई- नागपूर हायवेवर रस्ता रोको

आधुनिक केसरी न्यूज



**लोणार :** सुलतानपूर येथील वार्ड क्र.१,२,६ मध्ये जाणून-बुजून राजकीय व्देष भावनेतून विकास कामे न करणाऱ्या व आलेल्या निधीचा गैरवापर करून बोगस काम करणाऱ्या सरपंचाला निलंबित करून गुन्हा दाखल करण्यात यावा व मुजोर वैद्यकीय अधिकारी सोनी मॅडम यांची तत्काळ हकालपट्टी करण्यात यावी.आदी मागण्यासाठी नागवंशी संघपाल पनाड वंचित नेते व ईतर ग्रामपंचायत सदस्य यांच्या नेतृत्वामध्ये सुलतानपूर येथे आंदोलन करण्यात आले. सरपंच पती यांच्या मनमानी कारभारामुळे व राजकीय दोष भावनेमुळे ज्या वार्डामध्ये विकास कामे करण्याची खरी गरज आहे त्या ठिकाणी विकास कामे होत नाहीत. ज्या ठिकाणी अगोदर विकास कामे झाली आहेत परत त्याच ठिकाणी जाणून-बुजून विकासकामे केली जातात. सध्या गावांमध्ये भयंकर पाणीटंचाई असून नळाला येणारे पाणी हे २०ते २५ दिवसांनी येते यासाठी सरपंच यांच्याकडून पाण्यासाठी कुठलीच उपाययोजना केली जात नाही. विद्यमान सरपंचपती हेमराज लाहोटी यांच्या अध्यक्षतेखाली गेल्या दहा-पंधरा वर्षा अगोदर सुलतानपूर येथे अंदाजे दोन कोटी रुपयांची महाजल योजनेचे काम झाले होते. परंतु ते कागदोपत्री दाखवून करोड रुपयांच्या भ्रष्टाचार त्या कामामध्ये झालेला आहे. त्यामुळे सुलतानपूर वाशियांना पाण्यासाठी भटकंती करावी लागते. त्यानंतर सध्या सुलतानपूर सह पाच गावांमध्ये 22 कोटी रुपयांचे जलजीवन मिशन योजनेचे काम सध्या चालू आहे परंतु हे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे म्हणजे त्या कामामध्ये माती मिश्रित डस्ट च्या साह्याने टाकीचे काम होत आहे. दीड ते दोन फुटावर पाईप टाकून बोगस पद्धतीने होत आहे. केवळ पदाधिकाऱ्याच्या टक्केवारीमुळे बोगस काम होत आहे. महाजल प्रमाणेच हे काम न होता अंदाज पत्रकानुसार व्हावे. व झालेले बोगस काम जमीनदोस्त करण्यात यावे. २०२३ -२३मध्ये दलित वस्ती अंतर्गत वीस लाख रुपयांचे सिमेंट रोडचे काम वार्ड क्रमांक ५ मध्ये करण्यात आले. परंतु हे काम अंदाजपत्रकानुसार न करता अत्यंत बोगस पद्धतीने करण्यात आले. आज रोजी त्या रोडला तडे जाऊन अनेक ठिकाणी रोड उखडला आहे. त्यामुळे बोगस काम करणाऱ्या ठेकेदार अधिकारी कर्मचारी व पदाधिकारी यांच्यावर अनुसूचित जाती जमाती अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात यावे. व सरपंच पती यांचा अनेक वेळा ग्रामपंचायत कार्यालयीन कामकाजामध्ये हस्तक्षेप झाल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळे सरपंच यांना तत्काळ निलंबित करण्यात यावे. या व आदी मागण्याच्या संदर्भात व ग्रामपंचायत मधील भोंगळ कारभाराविरोधात सुलतानपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी मुंबई- नागपूर हायवे वरती डफडे वाजून रस्ता रोको आंदोलन दि.१०/०६/ २०२४ रोज सोमवारला करण्यात आले.

यावेळी आपला रोष व्यक्त करण्यासाठी हजारो महिला व पुरुषानी आंदोलनामध्ये सहभागी झाले होते. आंदोलन यशस्वी करण्यासाठी युवा नेते अनित्य घेवंदे, शेख अख्तर भाई, सरपंच सलीम शेठ, मा. सरपंच पुरूषोत्तम गाडेकर, डॉ. राम कडूकर, संतोष पाटील, संतोष शिंदे, शे.अमीर भाई, शंकर निलक, सद्दाम भाई, भारत पनाड,अनंथा टकले, असीम भाई, साबेर भाई, रोशन भाई, सम्मद भाई, गजानन जुमडे, अफजल भाई, सुबान भाई, चाँदभाई वार्ताहर, मोबिन भाई, अन्सार शाह, वाजीद भाई, जावेद भाई, नामदेव पनाड, मनोहर पनाड, श्रीराम पनाड, बबन पनाड, नागशेन पनाड, अतीष पनाड, गजानन पनाड,महेश मोरे, कळणू जावळे, पारस पनाड, बिंबिसार पनाड, सुनिल शेजूळ, संजय शेजूळ, शिवाजी खोलगडे, राजहंस जावळे, रामा पनाड, आकाश घेवंदे, संदेश पनाड, महेंद्र पनाड, भूषण जावळे, अकाश पनाड, अमोल आनंदराव, दिपक आनंदराव सुमनबाई पनाड, (ग्रामपंचायत सदस्य) सिंधूबाई पनाड, शोभाबाई घेवंदे, छायाबाई पनाड, केशरबाई गवई, जिजाबाई वाकळे, अलकाबाई पनाड, शांताबाई पनाड, शकुंतलाबाई जावळे ताईबाई पनाड, अस्मिता पनाड उपस्थित होते. आंदोलनामध्ये कुठेही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाचे कर्तव्यदक्ष ठाणेदार शिंगटे साहेब व बिट जमादार कटक साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली, जाधव साहेब, रिंढे साहेब, नांगरे साहेब यांनी चोख बंदोबस्त ठेवला.

**उशिरापर्यंत चाललेले डफडे वाजून रस्ता रोको आंदोलन यशस्वी :** वार्ड क्रमांक १ मध्ये १३ लाख रुपये सिमेंट रोड च्या कामाचे भूमिपूजन करून कामाला सुरुवात.. व ईतर मागण्या संदर्भात बाहेरील तालुक्यातील चौकशी समिती नेमून कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले. आंदोलनाच्या मागण्या संदर्भात चर्चा करून सर्व मागण्या मान्य करत समस्या मार्गी काढण्यासाठी लोणार पंचायत समिती कार्यालयाचे साह्यक गटविकास अधिकारी घुगे साहेब, विस्तार अधिकारी ठोके साहेब, मुंढे साहेब,ग्रामविकास अधिकारी काव्हरके साहेब, रिंढे साहेब उपस्थित होते.

## शिरूरच्या चांडोहचे डॉ. बरकले यांची नोडल अधिकारीपदी निवड; शासनाकडून नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज



**कवठे येमाई :** शिरुर तालुक्यातील चांडोह येथील डॉ.पांडूरंग विठ्ठल बरकले यांची राज्यस्तरीय गुणवत्ता हमी कक्षाच्या नोडल अधिकारी पदी शासनाकडून नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) चे सल्लागार पदाबरोबरच नोडल अधिकारी म्हणून डॉ.बरकले यांच्याकडे अतिरिक्त पदभार देण्यात आला आहे.

शासन निर्णयानुसार राष्ट्रीय उच्चतर शिक्षा योजना अंतर्गत मार्गदर्शक तत्वात नमूद केल्याप्रमाणे राज्यात शिक्षणाची गुणवत्ता राखून त्यामध्ये सुसुत्रता आणण्यासाठी तसेच निरीक्षण पध्दत सुलभ करण्यासाठी राज्यस्तरीय गुणवत्ता हमी सेल गठीत करण्यात आला आहे. उच्चतर शिक्षणात गुणवत्ता, सर्वदूर संधी व समानता आणण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या राष्ट्रीय उच्चतर शिक्षण अभियानाची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरीय गुणवत्ता हमी सेल च्या कार्यालयाची व्यवस्था रुसा संचालनालय, मुंबई येथे करून सदर कार्यालयासाठी आवश्यकतेप्रमाणे मनुष्यबळ रूसा संचालनालयाने उपलब्ध करून द्यावे असे सदर शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे. या अनुषंगाने रूसा संचालनालयाकडून राज्यस्तरीय गुणवत्ता हमी कक्षा चे कामकाज पाहण्यासाठी नोडल अधिकारी म्हणून रूसाचे सल्लागार डॉ.पांडूरंग बरकले यांची नियुक्ती करण्यात आली आहे.रुसा सल्लागार म्हणून काम सांभाळून राज्यस्तरीय गुणवत्ता हमी कक्षाच्या कामाचा अतिरिक्त कार्यभार देखील त्यांच्या कडे देण्यात आला आहे. चांडोह सारख्या अत्यंत छोट्या गावात शेतकरी कुटुंबातील डॉ.पांडूरंग बरकले यांचे प्राथमिक शिक्षण चांडोह येथे व बारावी पर्यंतचे शिक्षण पिंपरखेड येथील श्रीदत्त माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या कला शाखेत झाले आहे.पंधरा वर्ष एस एन डी टी महिला विद्यापीठात इंग्रजी विभागाचे प्रमुख म्हणून त्यांनी काम केले आहे.प्राध्यपक म्हणून कार्यरत असताना जागतिक इंग्रजी साहित्यावर प्रबंध सादर करत मुंबई विद्यापीठाकडून त्यांनी पी एच डी प्राप्त केली आहे. शिक्षण क्षेत्रातील अनुभवाची दखल घेऊन राज्य शासनाने त्यांची दोन वर्षांपूर्वी राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान अर्थात रूसाचे सल्लागार म्हणून त्यांची नियुक्ती केली आहे. रूसाचे सल्लागार म्हणून काम करत असताना शासनाकडून त्यांची राज्यस्तरीय गुणवत्ता हमी कक्षाच्या नोडल अधिकारी पदी निवड करण्यात आली आहे.या निवडी बद्दल डॉ. बरकले यांचे चांडोह,पिंपरखेड ग्रामस्थ व मित्र परिवाराकडून अभिनंदन होत आहे.

## कोनमध्ये आढळला तुटलेल्या बोटाचा तुकडा

### कंपनीविरोधात मलाड पोलिसांत गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुंबईतील मालाड परिसरात एक धक्कादायक घटना घडली आहे. आईस्क्रीमच्या कोनमध्ये मानवी बोटाचा तुकडा सापडला आहे. मलाड पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास करण्यात येत आहे. पोलिसांनी तात्काळ ते मानवी बोट फॉरेन्सिककडे पाठवण्यात आले आहे. आईस्क्रीम ज्या ठिकाणी बनवले आणि पॅक केले त्याचाही शोध घेण्यात येणार असल्याचे एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

मलाडमधील एका महिलेने यम्मो कंपनीचे आईस्क्रीम ऑनलाईन मागवले होते. पण तिने ते खायला सुरुवात करताच तिच्या समोर मानवी बोटाचा तुकडा दिसला. आईस्क्रीम कोनमध्ये बोटाचा तुकडा पाहातच ती महिला ओरडू लागली आणि बेशुद्ध पडली. काहीक्षण तिच्या कुटुंबातील लोकांनाही काहीच समजले नाही. पण त्यांना सर्व प्रकार समजल्यानंतर तात्काळ मलाड पोलीस ठाणे गाठले. ओरलेम येथील रहिवासी ब्रेंडन सेराओ (27) यांनी बुधवारी ऑनलाइन डिलिव्हरी ॲपद्वारे यम्मो कंपनीचा आईस्क्रीम कोन ऑर्डर केला होता. त्या महिलेने सांगितले की, आईस्क्रीम कोनमच्या आत सुमारे 2 सेमी लांब मानवी बोटाचा तुकडा होता. सेराओ हे व्यवसायाने एमबीबीएस डॉक्टर आहेत. त्यांनी याबाबत तात्काळ पोलिसांत धाव घेत आपली तक्रार दाखल केली. पोलिसांनी याबाबत लेखी तक्रार दाखल केली आहे. यम्मो आईस्क्रीम कंपनीविरोधात मलाड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आईस्क्रीम कोनमध्ये आढळलेले मानवी बोट मलाड पोलिसांनी फॉरेन्सिक विभागाकडे तपासणीसाठी पाठवले आहे. पोलीस याप्रकरणाचा तपास कत आहेत.



## 'सगेसोयरे' अधिसूचनेची तातडीने अंमलबजावणी करा; महिलांचा रास्ता रोको

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी दिनांक 8 जूनपासून आमरण उपोषण सुरु केले आहे उपोषनाच्या सहाव्या दिवशीही आंदोलनाची कुठलीच दखल सरकारच्या वतीने न घेतल्याने व मराठा समाजाची फसवनुक करणाऱ्या महाराष्ट्र सरकारच्या विरोधात शांततेच्या मार्गाने रास्ता रोको करून उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत सरकारला साडी,चोळी, व बांगड्याचा आहेर देण्यात आला. या वेळी महिलांनी सरकार विरोधी घोषण देत दोन तास रास्ता रोको आंदोलन केले. मनोज जरांगे पाटील या संघर्षयोद्ध्याच्या समर्थनार्थ छत्रपती शिवाजी महाराज चौकात महिलांची गर्दी मराठा रणरागिणींने रस्ता रोको करून प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले. मनोजदादा जरांगे पाटील यांचे मराठा आरक्षणासाठी मागील आठ ते दहा महिन्यात हे चौथे उपोषण आहे मागील पाच दिवसांपासून उपोषण चालू आहे. दादांचे शरीर त्यांना साथ देत नाही, "लाख गेले तरी चालतील पण लाखांचा पोशिंदा वाचला पाहिजे." यासाठी , मराठायोद्धा मनोज जरांगे पाटील यांना आपण खंबीरपणे साथ द्यायची देण्या साठी व मागण्या पूर्ण व्हाव्यात यासाठी हे आंदोलन करण्यात आले. " आरक्षण द्या नाही तर बांगड्या भरा "अशा घोषणा देत निवेदन देण्यात आले.या वेळी सकल मराठा समाजाचे महीला व पुरुष मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर